



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक १११ * नांदेड * सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# डोनाल्ड ट्रम्प थांबलेल्या हॉटेलमध्ये गोळीबार

## व्हाईट हाऊस पत्रकारांच्या डीनर दरम्यान गोळीबार

**वॉशिंग्टन (वृत्तसंस्था) –** अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डीसी येथील वॉशिंग्टन हिल्टन हॉटेलमध्ये आयोजित व्हाइट हाऊस कॉरेस्पोंडेंट्स (पत्रकार) डिनरदरम्यान गोळीबाराची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना लक्ष्य करण्यात आल्याची माहिती समोर आली असून कार्यक्रमात एकच गोंधळ उडाला. घटनेनंतर सीक्रेट सर्व्हिसच्या एजंटांनी तात्काळ हालचाल करत ट्रम्प यांना सुरक्षित स्थळी हलवले. काही वेळातच संशयिताला ताब्यात घेण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

अमेरिकेच्या वॉशिंग्टन हिल्टनमध्ये 'व्हाईट हाऊस करस्पाँडेंट्स डिनर'साठी डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या पत्नी मेलानिया उपस्थित होते... राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या उपस्थितीत डिनर कार्यक्रम सुरु होता.. अचानक ट्रम्प यांच्या अगदी समोर गोळीबार झाला... बँक्वेट हॉलमध्ये एकामागोमाग एक गोळ्यांचा आवाज येऊ लागला... ट्रम्प यांच्या



सुरक्षा रक्षकांनी तातडीनं ट्रम्प यांना घेराव घातला आणि त्यांना सुरक्षित बाहेर काढलं.. शिवाय उपराष्ट्राध्यक्ष जे.डी.व्हान्स यांच्यासह एफबीआयचे संचालक काश पटेल यांच्यासह वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांना खोलीतून तातडीनं बाहेर काढण्यात आलं..यानंतर ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर संशयित हल्लेखोराचा फोटो शेअर केला. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प भाषण सुरू करण्याच्या तयारीत असतानाच अचानक गोळीबार झाला. हॉलमधील उपस्थितांना तात्काळ जमिनीवर लेटण्याच्या सूचना देण्यात आल्या.

गोळीबार सुरू होताच सीक्रेट सर्व्हिसने डोनाल्ड ट्रम्प, मेलानिया ट्रम्प, उपराष्ट्राध्यक्ष जेडी वेंस आणि इतर मान्यवरांना सुरक्षित बाहेर काढले. एजंटांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला. घटनेनंतर काही वेळातच कायदा अंमलबजावणी यंत्रणांनी संशयिताला अटक केली. त्याच्याकडून शस्त्रसाठाही जप्त करण्यात आला आहे. रात्री ९:१७ वाजता ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल'वर पोस्ट करत सीक्रेट सर्व्हिसच्या धाडसाचं कौतुक केलं आणि आरोपी अटकेत असल्याची पुष्टी केली. त्यानंतर त्यांनी आपत्कालीन पत्रकार परिषद जाहीर केली. एफबीआयने या घटनेचा तपास सुरू केला असून आरोपीवर विविध गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या घटनेनंतर अमेरिकेतील उच्चस्तरीय सुरक्षा व्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मोठ्या कार्यक्रमांमध्ये सुरक्षा अधिक कडक करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

**ट्रम्प यांची प्रतिक्रिया :** ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून लिहिले, वॉशिंग्टनमध्ये आजची संध्याकाळ खूपच गजबजलेली होती. सीक्रेट सर्व्हिस आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांनी उत्कृष्ट काम केले. त्यांनी तात्काळ कारवाई केली. हल्लाखोराला पकडण्यात आले आहे आणि मी सुचवले आहे की आपण कार्यक्रम सुरू ठेवावा.

# नांदेडच्या विकासात कोणीही राजकारण करू नये- मंत्री उदय सामंत



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील मुखेड येथे होत असलेल्या एमआयडीसीबाबत शासनाने नोटिफिकेशन काढले असून त्यास मंजुरी दिली आहे. नांदेड जिल्ह्याच्या विकासासाठी कोणीही राजकारण करू नये. विकासासाठी सर्वांनी एकत्र यावे असे सांगत, महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकांना मराठी आली पाहिजे, असे स्पष्ट मत राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी नांदेड दौऱ्यात बोलताना केले.

उद्योग मंत्री उदय सामंत रविवार दि. २६ एप्रिल रोजी सकाळी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. हदगाव येथे एका सामूहिक विवाह सोहळा कार्यक्रमाला त्यांनी हजेरी लावल्यानंतर पत्रकारांशी ते बोलत होते. सध्या ऑटोचालक व टॅक्सीचालकांना मराठी बोलता, वाचता आली पाहिजे, असा फतवा सरकारच्या वतीने काढण्यात आला आहे. यावर सध्या वादविवाद सुरू आहेत. यावर ते म्हणाले की मराठी महाराष्ट्रातील नागरिकांना येणे अत्यंत गरजेचे आहे. याचे विनाकारण कोणीही राजकारण करू नये, असे सांगत छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराजांच्या विरोधात कोणीही वक्तव्य करणे हे चुकीचे आहे. त्यांना शिवसेना कदापी माफ करणार नाही. नांदेड विमानतळ हे विमान प्राधिकरणाकडे देण्यात आलेले आहे. हे पूर्वी एमआयडीसीकडे होते. तर नांदेड येथे हेलिपॅडचा कारखाना होणार आहे अशी चर्चा होत असल्याबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सामंत म्हणाले, मी याबाबत खा. अशोकराव चव्हाण यांच्याशी चर्चा करून पुरेपूर माहिती देईल अशी ग्वाही दिली.

शक्तिपीठ महामार्गाला विरोध करणाऱ्यांचा गैरसमज दूर करून हा मार्ग पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे. शक्तिपीठाला कोणीही विरोध करू नये, अडचणी असतील त्या शासन सोडवण्यासाठी तयार आहे. शक्ती पीठ हा राज्याच्या विकासाचा घटक आहे. तर विकासाला चालना मिळावी म्हणून मुखेड येथे होत असलेल्या एमआयडीसीला शासनाने मंजुरी दिली असून याबाबत नोटिफिकेशन काढले आहे, असे सांगितले. तर नांदेडमधील शिवसेनेत गट, तट असतील याबद्दल मी बोलणार नाही मात्र संघटना बांधणीचा अधिकार हा प्रत्येकाला आहे. संघटनेला विरोध कोणीही करू नये, असे ना. सावंत यांनी सांगितले यावेळी आ. हेमंत पाटील, आ. बाबुराव पाटील कोळेकर यांची उपस्थिती होती.

# ७ खासदार फुटीनंतर 'आप'समोर आणखीही संकट?

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** १४ वर्षांच्या इतिहासात अनेक चढ-उतार, यश आणि अंतर्गत कलह पाहणाऱ्या आम आदमी पार्टीमध्ये शुक्रवारी मोठा राजकीय भूकंप झाला. संसदीय दलात मोठी फूट पडून पक्षाच्या दोन-तृतीयांश खासदारांनी भाजपमध्ये प्रवेश केला. अरविंद केजरीवाल यांच्या पक्षात झालेल्या या आजवरच्या सर्वात मोठ्या फुटीनंतरही संकट टळलेले नाही, तर पक्षासमोर आता नवीन चिंता निर्माण झाली आहे.

पक्षापुढील मुख्य आव्हान आता दिल्ली या त्यांच्या सर्वात मजबूत आणि जुन्या गडामध्ये २२ आमदारांना एकत्र ठेवण्याचे आहे. विशेषतः राघव चड्ढा यांनीही पक्षात भविष्यात आणखी फूट पडण्याची दाट शक्यता वर्तवली आहे. ज्या प्रकारच्या फुटीचे ते सूत्रधार बनले आहेत, त्याकडे पाहता 'आप' आता त्यांच्या वक्तव्याला हलक्यात घेण्याची जोखीम पत्करू शकत नाही. आम आदमी पार्टीने शुक्रवारी सकाळी पंजाबमध्ये एक पत्रकार परिषद घेतली होती. त्यावरूनच पक्षात काहीतरी मोठी उलथापालथ होण्याची शक्यता असल्याचे सिद्ध झाले होते. पंजाबमधील पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, 'आप' नेत्यांवरील ईडीचे छापे हे विशिष्ट 'सूचनांनुसार' टाकण्यात आले होते. कार्यकर्त्यांनी पुढे सांगितले की, सध्या पक्षाची मुख्य प्राथमिकता दिल्लीतील २२ आमदारांच्या गटाला एकनिष्ठ आणि एकत्र ठेवणे ही आहे.

'आप'च्या एका नेत्याने सांगितले की, ज्या खासदारांनी पक्ष सोडला आहे त्यांच्याकडे पहा. त्यातील बहुतेक जण मोठे व्यावसायिक आहेत. आज ज्यांनी पक्षाची साथ सोडली, त्यातील अनेक जण २०२७ च्या पंजाब निवडणुकीसाठी 'आप'च्या जास्तीत जास्त नेत्यांना आपल्यासोबत नेण्याचा प्रयत्न करत होते.

## पश्चिम बंगालमध्ये ठिकठिकाणी ईडीच्या धाडी

**कोलकाता (वृत्तसंस्था) –** पश्चिम बंगालमध्ये दुसऱ्या टप्प्यातील मतदानापूर्वीच अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) राजधानी कोलकात्यात आपली हालचाल वाढवली आहे. केंद्रीय तपास यंत्रणेने रविवारी सकाळी शहरातील दोन वेगवेगळ्या भागांत आनंदपूर आणि अलीपूर येथे दोन मोठ्या व्यावसायिकांच्या घरांवर आणि कार्यालयांवर छापेमारी सुरू केली. ही कारवाई कुख्यात 'सोनू पप्पू' प्रकरणाशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, ईडीची पथके सकाळी लवकर सुरक्षा दलांसह महानगरातील आनंदपूर येथील व्यावसायिक कल्याण शुक्ला यांच्या निवासस्थानी आणि अलीपूर येथील व्यावसायिक संजय कानोरिया यांच्या ठिकाणांवर पोहोचली. ईडी अधिकारी दोन्ही ठिकाणी कागदपत्रांची तपासणी करत आहेत.या छापेमारीमागील सर्वात मोठा दुवा नुकतेच अटक करण्यात आलेले व्यावसायिक जय कामदार यांना मानले जात आहे. दावा केला जात आहे की, जय कामदार यांच्या मोबाईल फोनमधून मिळालेल्या व्हॉट्सअॅप चॅटमधून अनेक संशयास्पद आर्थिक व्यवहारांचा खुलासा झाला आहे.

# बांग्लादेशी घुसखोरांना बंगालमधून हाकलून देऊ - पंतप्रधान मोदींचा इशारा

**पश्चिम बंगाल (वृत्तसंस्था) –** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ममता बनर्जी यांच्या सरकारवर जोरदार हल्ला चढवला. बनगाव येथील सभेत बोलताना त्यांनी घुसखोरांना थेट इशारा देत '२९ एप्रिलपूर्वी बंगाल सोडा, अन्यथा ४ मेनंतर कारवाई होईल' असा स्पष्ट इशारा दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या सभेनंतर भाजप आणि तृणमूल काँग्रेस यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

पंतप्रधान मोदी यांनी ममता बॅनर्जी सरकारवर घुसखोरांना आश्रय दिल्याचा आरोप केला. भाजप सत्तेत आल्यानंतर



प्रत्येक घुसखोराला बाहेरचा रस्ता दाखवला जाईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. मतुआ-नामशूद्र आणि इतर शरणार्थी कुटुंबांना नागरिकत्व, पत्ता आणि सर्व हक्क देण्याची हमी मोदी यांनी दिली. ही मोदींची गॅरंटी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

मोदी यांनी महिलांसाठी मोठी घोषणा करत सांगितले की, भाजप सरकार आल्यास दरवर्षी ३६,००० रुपये महिलांच्या खात्यात जमा केले जातील. तसेच अंगणवाडी आणि महिला आरोग्य कर्मचाऱ्यांच्या वेतनातही सुधारणा केली जाईल.

भाजपने बंगालमध्ये मुलींना सरकारी नोकऱ्यांमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याचे आश्वासन दिले आहे. यामुळे महिलांना दुहेरी लाभ मिळेल, असे मोदी यांनी सांगितले. मोदी यांनी आपल्या भाषणात ममता बनर्जी सरकारवर तीव्र टीका करत बंगालमध्ये बदलाची गरज असल्याचे सांगितले. आगामी निवडणुकांमध्ये जनतेने भाजपला संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

## होर्मुझमधून बारूदी सुरुंग काढायला लागू शकतात सहा महिने - अमेरिका

**तेहरान (वृत्तसंस्था) –** पश्चिम आशियातील संघर्षादरम्यान इराणने होर्मुज सामुद्रधुनीत बारूदी सुरुंगांची पेरणी करून हा मार्ग अत्यंत धोकादायक बनवला आहे. स्वतः इराणी सैन्यालाही या सुरुंग नेमक्या कुठे-कुठे टाकल्या आहेत, याची पूर्ण माहिती नाही. या सुरुंगा आता अमेरिकन सैन्य आपल्या विशेष जहाजांच्या मदतीने हटवण्याच्या मोहिमेत उतरले आहे. पेंटागॉनने सांगितले की, हे काम पूर्ण होण्यासाठी सहा महिन्यांपर्यंत कालावधी लागू शकतो. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हे प्रयत्न तिप्पट वेगाने करण्याचे आदेश दिले आहेत.

अमेरिकन संसदेच्या खालच्या सभागृहातील प्रतिनिधी सभेच्या सशस्त्र सेवा समितीसमोर नुकत्याच झालेल्या गोपनीय सादरीकरणात पेंटागॉन अधिकाऱ्यांनी या सुरुंगा हटवण्यासाठी सहा महिन्यांचा अंदाज व्यक्त केला. संरक्षणमंत्री पीट हेगसेथ यांनी या आकड्याची पुष्टी करण्यास नकार दिला, मात्र तो फेटाळलाही नाही. त्यांनी सांगितले की, योग्य कालमर्यादेत या सुरुंगा हटवण्याच्या क्षमतेवर सैन्याला पूर्ण विश्वास आहे. ट्रम्प यांनी दोन दिवसांपूर्वीच सांगितले होते की, अमेरिकन माइनस्वीपर जहाजे आधीपासूनच सामुद्रधुनी साफ करत आहेत. त्यांनी ही कारवाई तिप्पट प्रमाणात वाढवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, सामुद्रधुनीत बारूदी सुरुंग टाकणाऱ्या कोणत्याही बोटीवर हल्ला करण्याचे स्वतंत्र आदेशही नौदलाला दिले आहेत.

# राज्यात उष्णतेचा कहर! अकोल्यात ४६ अंशांचा इशारा, उष्माघाताने परभणीत मृत्यू

**मुंबई (प्रतिनिधी) –** राज्यभर उष्णतेचा पारा प्रचंड वाढला असून नागरिकांच्या अंगाची अक्षरशः लाहीलाही होत आहे. मराठवाडा, विदर्भासह संपूर्ण राज्यात उन्हाचा तडाखा वाढला असून दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडताना दिसत आहेत. अकोल्यात काल या मोसमातील सर्वाधिक ४५.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. हवामान विभागाने पुढील दोन दिवसांत तापमान ४६ अंशांपर्यंत जाण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे शहरात ऐन दुपारी अघोषित संचारबंदी असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

गेल्या काही दिवसांत अकोल्यातील तापमानात सातत्याने वाढ होत आहे. या वाढत्या तापमानामुळे अकोला हे जगातील सर्वाधिक तापमान असलेल्या शहरांपैकी एक ठरत आहे.




परभणीत ३७ वर्षीय शिवाजी बबन कांबळे यांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. दिवसभर उन्हात फिरल्यानंतर त्यांना चक्कर आली आणि त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. जळगाव शहरात तापमान ४३ अंशांच्या पुढे गेल्याने महानगरपालिकेने शहरातील प्रमुख चौकांमध्ये टँकरद्वारे पाणी मारण्याची मोहीम राबवली आहे. महापौर दीपमाला काळे यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली. मुंबईत उन्हाचा तडाखा वाढला आहे. एप्रिल महिन्यातच मुंबईचा पारा ३९ अंश सेल्सिअस वर पोहचला आहे. हवामान विभागाकडून खरंतर रविवारी आणि सोमवारी मुंबई शहरात आणि मुंबईच्या लगतच्या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला होता. यानंतर आज मुंबईत चक्क पारा ३९ अंश सेल्सियस वर पोहोचला आहे. या उन्हापासून वाचण्यासाठी मुंबईकरांनी घरी राहण्यास पसंती दिली आहे.

देशातील वीज मागणीचा उच्चांक नोंदवला गेलाय. एप्रिल महिन्यात विजेच्या मागणीने २४० गिगावॉटचा टप्पा गाठला. गेल्या वर्षी जून महिन्यात विजेची सर्वाधिक मागणी २४२.७७ गिगावॉट इतकी नोंदवली गेली. वाढती उष्णता आणि एप्रिल महिन्यापासूनच सुरू झालेल्या हीटवेव्हमुळे देशभरात विजेच्या मागणीत लक्षणीय वाढ झाली आहे.

## पंजाब सरकारने सुरक्षा काढली : केंद्र सरकारकडून हरभजन सिंगसाठी कमांडो तैनात

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** पंजाब सरकारने सुरक्षा काढून घेतल्यानंतर अवघ्या काही तासांतच केंद्रीय गृह मंत्रालयाने हरभजन सिंग आणि इतर बंडखोर खासदारांना सीआरपीएफची सुरक्षा प्रदान केली आहे. हरभजन सिंग यांच्या घराबाहेर 'गद्दार' असे लिहून वाढता विरोध पाहता केंद्र सरकारने हे पाऊल उचलले आहे. आता हे सर्व नेते दिल्ली आणि पंजाबमध्ये केंद्रीय सुरक्षा कवचाखाली राहतील.

केंद्रीय गृह मंत्रालयाने माजी क्रिकेटपटू आणि राज्यसभा खासदार हरभजन सिंग यांच्याबाबत मोठा निर्णय घेतला आहे. पंजाब सरकारने सुरक्षा मागे घेतल्यानंतर केंद्र सरकारने हरभजन सिंग यांना उठझऋ ची सुरक्षा पुरवली आहे. आता 'टर्बनेटर'ला दिल्ली आणि पंजाब या दोन्ही ठिकाणी केंद्रीय सुरक्षा दलांचे कवच मिळेल आणि सीआरपीएफचे कमांडो त्यांच्या सुरक्षेसाठी तैनात असतील. गृह मंत्रालयाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हरभजन सिंग यांच्यासह आम आदमी पार्टीतून भाजपमध्ये आलेल्या इतर खासदारांनाही- संदीप पाठक, अशोक मित्तल, स्वाती मालीवाल, राजेंद्र गुप्ता आणि विक्रमजीत साहनी यांना केंद्रीय सुरक्षा देण्यात आली आहे. या सर्व नेत्यांना आता उठझऋ चे कमांडो सुरक्षा प्रदान करतील. या नेत्यांवरील वाढता धोका आणि पंजाबमधील त्यांच्या निवासस्थानाबाहेर सुरू असलेली निदर्शने लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.




## डंपर आणि होंडा सिटी कारची धडक; नायब तहसीलदारांचा मृत्यू

**पुणे (प्रतिनिधी) –** पुण्यातील जुन्नर तालुक्यात प्रशासकीय वर्तुळाला हादरवून टाकणारी एक अपघाताची घटना घडली असून, यामध्ये जुन्नरचे निवडणूक नायब तहसीलदार अनंता बनाजी गवारी (५२ वर्षे) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. बनकरफाटा-जुन्नर मार्गावर गणपती फाट्याजवळील 'एस कॉर्नर' परिसरात एका हायवा डंपर आणि होंडा सिटी कारची समोरासमोर जोरदार धडक होऊन हा भीषण अपघात झाला. कर्तव्यावर असलेल्या एका जबाबदार अधिकाऱ्याचा अशा अपघाती निधनामुळे महसूल विभागात शोककळा पसरली असून, संपूर्ण जुन्नर परिसरात या घटनेमुळे मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

महसूल विभागातील अधिकारी



अनंता गवारी हे त्यांच्या होंडा सिटी कारने बनकरफाटाच्या दिशेने निघाले होते. याच दरम्यान 'एस कॉर्नर' वळणावर समोरून म्हणजेच पांगरीमाथा बाजूकडून येणाऱ्या एका हायवा डंपरने त्यांच्या कारला समोरासमोर भीषण धडक दिली. ही धडक इतकी जबरदस्त होती की कारच्या समोरील भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला आणि वाहन नियंत्रणाबाहेर जाऊन रस्त्याच्या उलट दिशेला फेकले गेले. या भीषण अपघाताने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

## लातूर जिल्ह्यात उष्माघाताचा तिसरा बळी

**लातूर (प्रतिनिधी) –** लातूर जिल्ह्यात उष्माघाताच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून आणखी एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. औसा तालुक्यातील एरंडी गावात तीव्र उन्हामुळे २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. महेश लिंबाजी इंगोले असं या तरुणाचं नाव आहे. यामुळं परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे

मृत तरुणाचे नाव महेश लिंबाजी इंगोले असे आहे. तो शेतातील काम आटोपून घरी परतल्यानंतर अचानक त्याला चक्कर आली आणि तो खाली कोसळला. कुटुंबियांनी तातडीने त्याला सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र उष्माघातामुळे त्याचा जागीच मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. यापूर्वीही जिल्ह्यात उष्माघाताच्या दोन घटना समोर आल्या होत्या.

# शिवरायांबाबत वादग्रस्त विधान करणाऱ्या बागेश्वर बाबाचा माफीनामा

**मुंबई (प्रतिनिधी) –** बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री (बागेश्वर बाबा) यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्याबाबत वादग्रस्त विधान केले होते. यामुळे राज्यात मोठा वाद निर्माण झाला होता. यानंतर आता बागेश्वर बाबांनी माफी मागितली आहे.

शिवरायांबाबत केलेल्या वादग्रस्त विधानावर बोलताना बागेश्वर बाबांनी म्हटले की, माझे वक्तव्य वेगळ्या पद्धतीनं दाखवलं जातं आहे. मला याच दुख आणि खेद आहे. शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, आम्ही शिवरायांची निंदा ऐकू शकतं नाही. आम्ही छत्रपती शिवरायांना मानणारे आहोत. गुरू महिमासाठी मी ते वक्तव्य केलेलं होतं. माझ्या वक्तव्यांनी कुणाचं मन दुखावलं असेल तर मी माफी मागतो. माझं वक्तव्य चुकीच्या पद्धतीनं दाखवण्यात आलं



आहे.

बागेश्वर बाबांच्या या विधानानंतर संपूर्ण राज्यातून संताप व्यक्त करण्यात आला होता. मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले होते की, 'शिवरायांचा अपमान भाजप सरकारच घडवून आणतंय की काय अशी शंका यायला लागली आहे. एखाद्या वेळेस आता यांना फटकावलं पण पाहिजे, आता फक्त कमेंट करून, निषेध करून आणि सोशल मीडियावरच बोलून चालणार नाही. आता हे झोडावेच लागणार आहेत मग आता शांत बसून नाही चालणार. छत्रपतींचा जर हे अवमान करत असतील तर झोडावंच लागेल. केस होईला याला कधीपर्यंत भ्यायचं? भाजप सरकारने आणि देवेंद्र फडणवीस यांनी हे लोकं थांबवले नाहीत तर एकदा झोडाझोडी होणारच आहे. गुन्हा दाखल करून काहीच होणार नाही, यांना फटके दिले तरच हे थांबणार आहेत, यांना दुसरा पर्यायच नाही.' अभिनेता रितेश देशमुखनेही बागेश्वर बाबांच्या विधानावर नाराजी व्यक्त केली होती. त्यांनी म्हटले की, शिवाजी महाराजांबद्दल वापरलेले कोणतेही अपशब्द किंवा आक्षेपार्ह विधाने शिवप्रेमी कधीही खपवून घेणार नाहीत. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशाप्रकारचा कोणताही उल्लेख इतिहासात नाही असं विधान केलं होतं. संभाजी ब्रिगेडनेही माफी मागा अन्यथा बागेश्वर बाबाला महाराष्ट्रात फिरु देणार नाही, अशी तंबी दिली होती.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# युद्धः प्राणीमात्रांच्या शेवटाची सुरुवात

अमेरिकेचा मनोरुग्ण अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या-मुळे संपूर्ण जगावर युद्ध लादल्या गेले आहे. हे केवळ दोन देशातील युद्ध नसून संपूर्ण जगाची आर्थिक नाडी आवळण्याचा हा एक अश्लाघ्य प्रयत्न आहे. यामध्ये मनुष्यच नव्हे तर जगातील इतर प्राणी देखील कष्ट सहन करीत आहेत. या युद्धाच्या अस्थिर जगात माणसाच्या अस्तित्वावरच नव्हे, तर निसर्गाच्या संपूर्ण परिसंस्थेवर मोठा घाव बसत आहे. युद्ध, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि अतिरेकी विकासाच्या हव्यासात आपण निसर्गाशी असलेले आपले नाते विसरत चाललो आहोत. परिणामी, वनसंपदेचा झपाट्याने होत असलेला विनाश आणि वन्यजीवांचे अस्तित्त्व धोक्यात येणे ही केवळ पर्यावरणीय समस्या राहिलेली नाही, तर ती मानवाच्या भवितव्यालाच प्रश्न विचारणारी गंभीर बाब बनली आहे. अलीकडील आंतरराष्ट्रीय संघर्षांमध्ये प्रचंड प्रमाणावर बॉम्ब आणि क्षेपणास्त्रांचा वापर होताना दिसतो. या युद्धांमुळे केवळ मानवहानीच होत नाही, तर जंगल, नद्या, माती आणि हवामान यांचेही अपरिमित नुकसान होते आहे. युद्धाच्या ज्वाळांमध्ये वनक्षेत्र जळून खाक होते, प्राण्यांची अधिवास नष्ट होतात आणि जैवविविधतेचा समतोल ढासळतो. युद्धाचा निसर्गाशी काहीही संबंध नसतानाही त्याची किंमत मात्र निसर्गालाच चुकवावी लागते, ही शोकांतिका आहे. मागील काही दशकांमध्ये जगभरात जंगलतोडीचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले आहे. विशेषतः उष्ण कटिबंधीय वर्षावनांमध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाल्यामुळे पृथ्वीचे फुफ्फुसे म्हणून ओळखले जाणारे ॲमेझॉनसारखे प्रदेशही धोक्यात आले आहेत. वनक्षेत्र कमी झाल्या-मुळे कार्बन शोषणाची क्षमता घटली आणि परिणामी जागतिक तापमानवाढीचे संकट अधिक गडद झाले आहे. हवामान बदलाचे दुष्परिणाम आज जगभर जाणवत आहेत, अनियमित पाऊस, तीव्र उष्णतेच्या लाटा, पूर आणि दुष्काळ यामुळे मानवासह सर्व सजीवांचे जीवन अस्थिर झाले आहे. भारताची परिस्थितीही यापेक्षा वेगळी नाही. देशात गेल्या काही वर्षांत वनक्षेत्रात लक्षणीय घट झाली आहे. वाढत्या लोकसंख्येचा दबाव, पायाभूत सुविधांच्या नावाखाली होणारी वृक्षतोड आणि बेकायदेशीर अतिक्रमण यामुळे नैसर्गिक अधिवास नष्ट होत आहेत. याचा थेट परिणाम वन्यजीवांवर दिसून येतो. बिबट्यांचे मानवी वस्त्यांमध्ये येणे, हत्तींचे गावांमध्ये घुसणे किंवा सिंहांचे शहरांच्या दिशेने वळणे, ही केवळ अपघाती घटना नसून निसर्गातील समतोल बिघडल्याची स्पष्ट लक्षणे आहेत. जंगलांमध्ये रेल्वेमार्ग, महामार्ग, खाण प्रकल्प आणि औद्योगिक क्षेत्र उभारल्यामुळे वन्यप्राण्यांच्या स्थलांतराच्या मार्गांमध्ये अडथळे निर्माण झाले आहेत. परिणामी अनेक प्राणी अपघातात मृत्युमुखी पडत आहेत. आफ्रिका आणि आशियातील जैवविविधतेने समृद्ध प्रदेशांमध्येही हीच परिस्थिती दिसून येते. शहरीकरणाच्या वेगाने जंगलांचा ऱ्हास होत असून, अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर आहेत. सिंह, हत्ती यांसारख्या बलाढ्य प्राण्यांनाही आज अस्तित्त्वासाठी झुंज द्यावी लागत आहे, ही वस्तुस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. मानव-वन्यजीव संघर्ष ही आजची मोठी समस्या बनली आहे. भारतात गेल्या काही वर्षांत अशा संघर्षात शेकडो हत्तींचा मृत्यू झाला आहे. वनक्षेत्र कमी झाल्यामुळे अन्न आणि पाण्याच्या शोधात प्राणी मानवी वसाहतींकडे वळतात आणि संघर्ष अटळ ठरतो. यात मानवहानीसह वन्यजीवांचेही मोठे नुकसान होते. ही समस्या केवळ वन विभागाच्या उपाययोजनांनी सुटणारी नाही, तर व्यापक धोरणात्मक बदलांची गरज आहे. इतिहासाचा मागोवा घेतला, तर वसाहतवादी काळापासूनच जंगलतोडीला सुरुवात झाली होती. चहा, कॉफी आणि रबरच्या लागवडीसाठी मोठ्या प्रमाणावर जंगलांचा बळी दिला गेला. मात्र विसाव्या आणि एकविसाव्या शतकात औद्योगिकीकरण आणि तांत्रिक प्रगतीच्या नावाखाली निसर्गाचा जो विध्वंस झाला, तो अधिक व्यापक आणि भीषण आहे. आजच्या तथाकथित विकास मॉडेलने पर्यावरणाचा विचार दुय्यम ठरवला आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. यामुळेच आता पर्यावरण संवर्धन हा पर्याय नसून गरज बनला आहे. वनसंवर्धनासाठी कठोर कायदे, त्यांची प्रभावी अंमलबजावणी, तसेच स्थानिक समुदायांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. वृक्षलागवड ही केवळ औपचारिकता न राहता ती दीर्घकालीन नियोजनाचा भाग असावी. वन्यजीव संरक्षणासाठी अभयारण्ये, कॉरिडॉर आणि सुरक्षित अधिवास निर्माण करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर विकास प्रकल्प राबवताना पर्यावरणीय परिणामांचा गांभीर्याने विचार केला गेला पाहिजे. कारण निसर्गाचे संरक्षण करणे म्हणजे आपल्या स्वतःच्या अस्तित्वाचे रक्षण करणे होय. जर आपण आजही जागे झालो नाही, तर उद्याच्या पिढ्यांना केवळ पुस्तकी माहितीमध्येच वन्यजीव आणि समृद्ध जंगलांचा इतिहास पाहावा लागेल. म्हणूनच विकास आणि पर्यावरण यामध्ये समतोल साधत, निसर्गाशी सुसंवाद साधण्याची वेळ आता आली आहे. नाहीतर, मानवानेच स्वतःच्या विनाशाची बीजे पेरलेली असतील.

# गोमाता राष्ट्रमाता



माता म्हणुनी संबोधले तुला
मान तुझा राखणार!
बालपणी दिलेल्या दुधाचे
उपकार नाही वि सरणार !!
आज वेळ परत्फेडीची तुझी
रक्षा आम्ही करणार !
तुला राष्ट्र मातेचा सन्मान
देण्यास कसर नाही सोडणार !!

साक्षात श्रीकृष्णाने आपले संपूर्ण बालपण गोमातेच्या सानिध्यात घालविले व आयुष्यभर माता म्हणून तीची पूजा केली. देव ज्या गोमाता स्वतःच्यावर मानतो. अशा या मातेला 'राष्ट्रमाता' घोषित करण्याचे आम्ही कसे विसरतो. सतयुगातून आज कलयुगापर्यंत धर्माने तिला सर्वोपरी मानले आहे, मग कोणती अडचण तिला राष्ट्रमाता घोषित करण्यात येत आहे, का तिच्या सुरक्षेची जिम्मेदारी घेण्यास माघार घेत आहोत? ती जेव्हा तीच्या बाळाला स्तनपान करत असते तेव्हा तिच्या बाळाला तिच्यापासून दूर केले जाते.. कशासाठी ? तर आमच्या बाळाला पौष्टीक दूध मिळावे यासाठी...

ती आनंदाने आमच्या बाळासाठी दूध देते. खूप लोक म्हणतात, दूध तर म्हैस, बकरी सर्वांचेच वापरलो, पितो मग गौमाता व तिचे दूधच कसे श्रेष्ठ, तिचे दुग्धच श्रेष्ठ नाही तर तीचे सर्वांग श्रेष्ठ आहेत. तिचे गौमुत्र, शेन ह्याची देखील मान्यता आहे. मोठे मोठे यज्ञ जिथे होतात तिथे शुद्धीकरणासाठी गोमूत्र व शेणाचा वापर केला जातो. आम्ही कुठे बकरी आणि म्हशीचे मुत्र, शेन, लेंड्या वापरलेल्या बघितल्या का? आमच्या पुराणात सांगितले आहे की गाईच्या शरीरात ३३ कोटी देवांचा वास असतो. ती ज्या घरात निवास करते. त्या घरात शुद्धतेचे वातावरण असते. तिच्या सेवेत जो आशीर्वाद लाभतो तो फलप्रद देतो. या बाबी जेव्हा सर्वांच्या लक्षात येतील तेंव्हा गोमाता श्रेष्ठ कशी हा प्रश्नच उद्भवणार नाही.

१९६६ साली गोमाताला राष्ट्रमाता घोषित करावे, ह्या चळवळीत कित्येक गोमातेचे तिच्याभक्ताची, साधु-संतांची निर्घृण हत्या केली गेली. सर्वत्र अशांततेचे वातावरण झाले होते. तर सांगा हो, ज्याचा मान त्याला देणे हे चुकीचे आहे काय? ह्या प्रश्नाचे उत्तर जेंव्हा आम्हाला मिळते तेंव्हा ते चुकीचे नाही असे येते. खरे उत्तर जसे सर्वांना कळते तसे कार्य त्यावर का होत नाही?

गेल्या कित्येक वर्षांपासून गोमातेला राष्ट्रमाता घोषित करणे व तिच्या सुरक्षिततेची जबाबदारी घ्या, दोन्ही बाबींवर होकार असून मोहर का लागत नाही. कोणत्या कारणाने विलंब होतो. सत्ता, पावर समज सर्व गोमातेच्या लेकरांजवळ आहे तरी गोमातेच्या डोळ्यात प्रतीक्षा आणि अश्रुच आहेत.

गोमातेची प्रतीक्षा दूर करण्यासाठी आणि या चळवळीत ज्यांची बळी गेली त्यांना न्याय देण्यासाठी सर्व गो भक्त परत एकत्रित आले आहेत. म्हणतात ना 'ईश्वर के घर देर है अंधेर नहीं' हाच विचार मनी धरून सरकारच्या न्यायावर-निर्णयावर सर्वांचे डोळे, कान टिकून आहेत.

माझ्या मते आई साठी, माते साठी कुठलाही पक्ष हा वेगळा नसतो. तिला तर वाटतं, माझ्या सर्व राजकीय पक्ष नेत्यांनी येऊन या निर्णयाला आनंदाने स्वीकार करवा. या चळवळीत कोणताही राजकीय पक्ष, धर्म हा प्रमुख नाही किंवा अध्यक्ष नाही इथे तर नंदी बाबा अध्यक्ष आणि गोमाता ही प्रमुख आहे.

यात अनेक साधू, संत, महंत यांचा तळमळीचा व कष्टाचा वाटा आहे. त्यांच्या ह्या कार्यात संपूर्ण गोभक्तांचा पाठींबा यांच्या सोबत आहे. ही आग, ही चळवळ आता देशभर पसरली आहे. म्हणून या प्रकल्पाला मोहर आता लागलीच पाहिजे. कारण-'अभी नहीं तो कभी नहीं'

गोमाता ही फक्त पौष्टिक दूध देते असे नाही. तीच्या गोमुत्राने किंवा शेणाने मानवी कौशल्याने विविध उद्योग उभारले जाऊ शकतात. जसे-गोमुत्राला शुध्द करून विविध औषधीत त्याचा उपयोग करता येतो. तसेच-शेणापासून-दिवे, गोकाष्ट, अगरबत्ती, अगरबत्ती स्टेडं, इंधनासाठी गौबरी, शेतीसाठी उत्तम असे शेणखत असे विविध उद्योग करता येतात. या माध्यमातून अनेक लोकांना रोजगार उपलब्ध होईल आणि काही प्रमाणात बेरोजगारी ही कमी होईल.

मोठ्या-मोठ्या गोशाळेत हे उद्योग चालू करता येतात. आणखी मोठा फायदा म्हणजे गाईच्या सहवासात राहून काम करणाऱ्यांना स्वस्थ शरीर लाभेल. त्याचे कारण की, तेथील वातावरण पूर्णतः सकारात्मक व शुद्ध हवा असते. जर गोशाळेत उद्योग चालू झाले तर कित्येक लोकांच्या दवाखान्याचा खर्च कमी होऊ शकतो. छोट्या-मोठ्या प्रत्येक गोशाळेत असे उद्योग चालू झाले तर गोमातेसाठी खूप पैसा जमा करण्याची गरज देखील भासणार नाही. कारण उद्योगातून आलेल्या पैशांतून गोमातेचे जीवन खाद्य हे सुव्यवस्थित व नियमित करता येईल.

'तेरा तुझको अर्पण क्या लागे मेरा' ही म्हण आम्ही नेहमी देवासाठी, भगवंतासाठी वापरत असतो. हे देवा माझ्या पदरात तुने जे टाकीले त्याचाच एक छोटा हिस्सा मी तुला अर्पण करतो, असे आम्ही म्हणत असतो. हेच आमच्या गोमातेसाठी सुध्दा सत्य आहे. तिच्या दुधाने, गोमुत्राने, शेणाने, अनेक उद्योग करून त्यातून जो पैसा येतो त्याच पैशाने आम्ही गवत, ढेप, गुळ आदी तिचे खाद्य पदार्थ खरेदी करून तिला खाऊ घालतो...आली परत तीच म्हण 'तेरा तुझको अर्पण क्या लागे मेरा' किती सामंजस्य देवाच्या कार्यात व गाईच्या कार्यात म्हणूनच तर आम्ही तिला देव मानतो. अशा या देवतेला आम्ही, प्रतीक्षेच्या किनाऱ्यावर उभं केलं आहे. ही प्रतीक्षा संपवा व गोमातेला तिचे योग्य स्थान देऊन तिला 'राष्ट्रमाता' घोषित करा.

**-सौ. सुनीता बजाज**
नांदेड

# 'तोंडात गोड आणि मनात खोड'

सध्या बरीच माणसे दिसायला वरवर चांगली दिसतात, परंतु त्यांच्या मनात खोड असते. आपल्याला असे बरेच उदाहरणे पाहता येतात की, छत्रपती शिवाजी महाराज यांना भेटण्यासाठी अफजलखान विजापूर येथून विडा उचलून वाईहून निघाला, पंढरपूर मार्ग तो प्रतापगडाच्या पायथ्याशी आला. तोंडामध्ये अतिशय गोड भाषा तो बोलू लागला. या राजे भेटा आम्हाला, तुम्ही आमच्या मुलासारखे आहात!, परंतु हे बोलणं त्याच फसवणूक (करणारे होतं. मनात कपट व खोड धरून गोड बोलून कायमस्वरूपी काटा काढण्यासाठी शामिन्यात आला होता, हे सर्व महाराजांनी ओळखून घेतले होते. त्यामुळे सोबत अंगरक्षक घेऊन अंगात चिलखत, बोटात वाघनखे, डोक्यावर जिरेटोप घालून ते त्याला भेटण्यासाठी अतिशय हुशारीने गेले होते, शेरास सव्वाशेर होते म्हणून महाराज वाचले, नसता इतिहास वेगळा झाला असता यालाच म्हणतात, तोंडात गोड आणि मनात खोड आहे. आज समाजामध्ये असे बरेच माणसं वेगवेगळे मुखवटे घालून फिरून फसवत आहेत. फक्त बोलताना अतिशय गोड बोलून आपल्या पायावर पाय देत आहेत, हे समाजातील लोकांनी ओळखून घ्यावे. जवळ बसणारे लोकसुद्धा अशा पद्धतीने वर्तन करत आहेत.

भाऊकीची लोकं यामध्ये सर्वात पुढे असतात, कारण बोलण्याची भाषा वेगळी आणि वागण्याची भाषा वेगळी, अलीकडच्या काळात तयार झाली आहे 'मुह मे राम। बगल मे छुरी' अशा पद्धतीने अगोदरपासूनच आपण ऐकतो. म्हणून सद्सद्विवेकबुद्धीने सध्याला वागण्याचा प्रयत्न करावे, कधीही कोणावरही शंभर टक्के विश्वास ठेवू नका? अति लोभ झाल्यानंतरसुद्धा वाईटपणा येतो, आणि मग असे माणसे मनात खोड ठेवून आपल्याला दगाफटका करण्याची दाट शक्यता असते.



अनेक प्रेमवीर प्रेमिका सोबत गोड बोलत असतात आणि वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन अनैतिक कृत्ये करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. विवाहाचा विषय काढला की काय घाई आहे? आताच कोणते वय आपले झाले आहे, असे म्हणून चल पुढच्या...चल पुढच्या ओढ्यात असे गोड बोलून वेळ मारून नेतात आणि टाळतात.

हे सर्व सध्या सर्वत्र सुरूच आहे, त्यासाठी तुम्ही चाणाक्षबुद्धीने राहा, चला आपण इकडे जाऊ, तिकडे जाऊ, सहलीला जाऊ, मामाच्यागावाला जाऊ, देवदर्शन करून येऊ, म्हणून मुलींना गोड बोलून आपल्या मोहपाशात पाडून विश्वासात घेतात, आणि दगाफटका करतात. अपहरण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे गोड बोलणाऱ्या लोकांपासून दोन हात दूर राहावे, काही लोक बरेच नाटकी असतात, दिसल्या बरोबर लगेच वाकून नमस्कार करणे, तोंड भरून स्तुती करणे किंवा तेवढ्यापुरतेच बोलून आपला हेतू साध्य करून घेणे आणि लगेच सोडून देणे असे ही काही गणगोत आहेत, त्यामुळे गोड बोलण्याला फसवू नका काल्पनिक बोलण्याला भाळू नका, बरेच जण काल्पनिक मोठेपणा सांगतात, आम्ही आता हे घेणार आहोत? ते घेणार आहोत? आता आम्ही लगेच मोठी खरेदी करणार आहोत? असे बोलतात आणि वास्तविकता वेगळी असते. म्हणून 'लबाडाचं आवतण जेवण केल्याशिवाय खरे नसते', म्हणून आज समाज प्रगतशील झाला. सत्ता, संपत्ती, पैसा जवळ आला, परंतु माणुसकी दूर गेली, कारण तुम्हालाच निवडून देऊ म्हणणारे लोकसुद्धा एका रात्रीत बदलून जातात, आणि निकाल दुसऱ्याच बाजूने लागतो, त्यासाठी तोंडात अतिशय गोडवा धरून बरोबर एखाद्याची कशी खोड मोडायची ते मोडतात. म्हणून तुम्ही सगळे जाणून निर्णय घ्या. निर्णय क्षमता तुमची मजबूत असावी. जाहिरात करते वेळेस लोक अतिशय गोड बोलतात. तुमच्याकडून जाहिरातीचे पैसे काढून घेतात, आणि त्या जाहिरातीतून नंतर वेगळाच अर्थ निघतो. मग ते परत आपल्याला बोलू देत नाहीत.

एके ठिकाणी जाहिरातीत ट्रॅक्टर खरेदीवर मारुती (फ्री) मोफत दिला जाईल असे बोलले, मात्र त्यांनी मारूती गाडी देण्याऐवजी मारुतीची मूर्ती ग्राहकांना मोफत दिली असेही काही गोड बोलून फसवणारे लोक आहेत. सध्या समाजात काही बाबा, भगत, बुवा, महाराज वावरत आहेत. हे अतिशय गोड बोलून मठाच्या वाऱ्या करायला लावत आहेत. पुढच्या वारीमध्ये तुमचं चांगलं होईल, असं नुसतं गोड बोलून अज्ञानी निरक्षर माणसाची फसवणूक करीत आहेत. पैशाचा पाऊस पाडतो म्हणून सुशिक्षित लोकांनासुद्धा भगत फसवतात, हे त्यांना फार उशिरा कळते, म्हणून अशा लोकांपासून होता होईल, तेवढे सावधान राहण्याचा प्रयत्न करावे, अति गोड बोलणं धोकादायक असते असे अनेक उदाहरणावरून आपल्याला सांगता येते, त्यासाठी आपण संपूर्ण माहिती घेतल्याशिवाय एखाद्या गोष्टीला होकार नकार देऊ नये. त्या ठिकाणची परिस्थिती पाहून निर्णय घ्यावे, तेव्हाच आपल्याला खरी माहिती मिळते, चुकीच्या माहितीतून आपला घात होतो, बरेच लोक फक्त गोड बोलून तुम्हीच यंदाच्या निवडणुकीत भावी...होणार आहात, तुमच्या एवढे हुशार कोण आहे, बाकीच्यांना काय कळते, असे अर्धसत्य बोलून मोठेपणा देऊन हरभऱ्याच्या झाडावर चढवतात, आणि नंतर चारी मुंड्या चीत करून फिदी फिदी हसत बसतात, हे होऊ नये म्हणून कोणाच्याही गोड बोलण्याला भाळून जाऊ नका, आपल्या माणसांना थोडा मोठेपणा कोणी दिला की आपण फार भाळून जातो, संपूर्ण घरदार त्यांना दाखवतो, जमीन -जुमला नोकर चाकर, डामडौल त्यामुळे पुढील व्यक्तीला आपला अंदाज येतो, आणि आपण फसतो, त्यामुळे अलीकडच्या काळामध्ये विवाहासाठी गोड बोलून मुली आणून देत आहेत, आणि दोन-तीन दिवसात त्या मुली त्या घरातून दाग दागिने, पैसे घेऊन पोबारा करत आहेत.

गोड बोलून काम करून घेणे वेगळे आणि गोड बोलून मुद्दाम कपटनीतीने फसवणे वेगळे यात बराच फरक आहे. पुतना मावशी श्रीकृष्णाला दूध पाजण्यासाठी अप्सरेचे रूप घेऊन आली होती, मी कृष्णाची मावशी आहे. असे दरबारातील लोकांना सांगत होती, तिची ही कूटनीती श्रीकृष्णाने ओळखली होती. त्यामुळे तिला मरणाला सामोरे जावे लागले.

काही लोक फ्लॉट खरेदी-विक्रीमध्येसुद्धा गोड बोलून दोघांच्या नावावर खरेदी करून देतात, आणि मनातून फसवणूक करतात. महाभारतातील एक घटना वास्तविक आहे. धृतराष्ट्राने भीमाला आलिंगन देण्याची इच्छा व्यक्त केली, आणि त्यावेळेस तो गोड गोड बोलत असला तरी भीमाला त्याच्या बहुपाशात घेऊन ठार मारण्याची त्यांनी योजना आखली होती. ही कपटनीती श्रीकृष्णांनी ओळखली आणि धृतराष्ट्राच्या पुढे लोखंडी पुतळा तयार करून ठेवला. कपटनीती काय असते? कशा पद्धतीने वागून त्या घटनेमधून सही-सलामत बाहेर यावे, हे ज्याला कळते तो व्यवस्थित जीवन जगतो.

कपटनीतीने किंवा कुटनीतीने दुसऱ्याला फसवण्यासाठी केलेले कृत्य स्वतःच्याच अंगावर आलेली आहेत, अशी काही उदाहरणं आहेत. म्हणून कपट नीतीचा अवलंब करू नका. स्वतः श्रम करा आणि मोठे व्हा, त्यावेळेस आपली कीर्ती वाऱ्यासारखी सर्वत्र पसरते, शेअर्स मार्केटमध्ये दुप्पट पैसे करून देतो म्हणून अनेक लोकांना सध्या फसवले जात आहे. मोहामुळे लोक फसत आहेत, म्हणून आपण कुठेही न फसता,आपला प्रपंच करावा नेटका, त्यावेळी सर्व बरे होईल असे मला वाटते.

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष,
विठूमाऊली प्रतिष्ठान खैरकावाडी,
ता. मुखेड जि. नांदेड

# शेजारधर्म अन् मानव प्रवृत्ती

आज बागेत गर्दी कमी होती. नेने, पाठक, कुलकर्णी आणि रेगे हे चौघे एकाच ऑफिसमधून निवृत्त होऊन एकाच एरियात रहायला आले होते. सकाळ आणि संध्याकाळ बागेत फिरून प्राणायाम, व्यायाम आणि थोड्या गप्पा करून घरी परतत असत. यातील नेन्यांची आणि कुलकर्णींची मुले लग्नानंतर परदेशी स्थायिक झाल्याने मिस्टर आणि मिसेस एवढेच त्यांचे कुटुंब! चौघांच्या बायकाही कधी कधी संध्याकाळच्यावेळी बागेत यायच्या, पण वृद्धावस्था आणि गुडघेदुखीमुळे फिरणे कमीच व्हायचे. मग चौघी मिळून तब्येतीच्या कुरबुरी, जोडीदारांच्या कागाळ्या उगाळत बसत. पाठक आणि रेगे यांना मुलीच असल्याने त्या लग्न करून आपापल्या घरी सुखात राहत होत्या. नाही म्हणायला एखाद्या शनिवार रविवारी आई वडिलांना भेटायला चक्कर मारत पण त्यांच्याही नोकऱ्यां, मुलेबाळे यामुळे त्यांना क्वचितच वेळ मिळत असे. मुली रहायला आल्या की पाठक आणि रेगेबाई बागेत येत नसत. आपल्या मुलींना चारीचीज करून खायला घालावे असे त्या ठरवत. परंतु नेने आणि कुलकर्णी यांची मुले परदेशात असल्याने वर्षातून एकदाच महिन्याची सुट्टी घेऊन भारतात येत. पण महिन्याभरात घरात त्यांचा वेळ कमीच जाई. मित्रमंडळ, नातेवाईक, भटकंती आणि हॉटेलिंग यातच महिना कधी संपून जाई तेही कळत नसे. त्यामुळे मुले आली काय आणि गेली काय असे त्यांना काही फरक पडत नसे. नाही म्हणायला नातवंडांचा मात्र त्यांना चांगला सहवास मिळत असे.

मुले आणि सुना आपल्या मुलांना वृद्ध आई-वडिलांकडे सोपवून फिरायला, शॉपिंगला जात. त्यामुळे आजी-आजोबांना नातवंडांशी खेळायला, गप्पा मारायला खूप आवडायचे. त्यांच्या सहवासात ते खुश असत. कारण त्यांना दटावणाऱ्या ममाडॅडापेक्षा लाड करणारे आजीआजोबा फार आवडत असत. चारी वृद्ध जोडप्यांचा वेळ एकमेकांच्या सहवासात चांगला जात असे. कोणी आजारी पडले की एकमेकाला मदत करायला ते नेहमी तत्पर असत.

एके दिवशी मात्र रेग्यांच्या छातीत अचानक दुखू लागले. यांच्या पत्नीला काय करावे तेच कळेना! मुलींना फोन करू की वृद्ध मित्रांना कळवू की पहिले डॉक्टरांना



फोन करू? इकडे रेगे छातीवर हात दाबून विव्हळत होते. तेव्हा मिसेस रेग्यांनी आधी डॉक्टरांना फोन करत सांगितले, डॉक्टर ताबडतोब या! माझ्या मिस्टरांना छातीत वेदना होत आहेत. चौघांही जोडप्यांचे फॅमिली डॉक्टर एकच असल्याने त्यापैकी कोणीही बोलवले की डॉक्टर हातातील काम टाकून पळत येत असत. येताना इतरांनाही फोन करून कल्पना देत. रेगे वहिनींनी डॉक्टरांना फोन करून आपल्या मुलीला फोन लावला पण तिचा फोन नॉट रिचेबल दाखवत होता. त्या मनाने घाबरून गेल्या होत्या. इतक्यात पाठक, कुलकर्णी धावतच आले. कारण डॉक्टरांनी पोहोचेपर्यंत त्यांच्या छातीवर हाताने दाब देण्याचे सांगितले होते. रेग्यांची अवस्था पाहवली जात नव्हती. वेदनेने ते अक्षरशः तळमळत होते. कुलकर्णी पुढे आले आणि रेग्यांच्या छातीवर आपले दोन्ही हात एकावर एक ठेवून दाब देऊ लागले. पाच मिनिटात डॉक्टरही तिथे पोहचले. त्यांनी रेग्यांना वेदनाशामक इंजेक्शन दिले आणि म्हणाले, रेगे, तुम्हाला माईल्ड हार्ट अटॅक आला होता परंतु आता चिंता करण्याचे काही कारण नाही. तुम्ही आराम करा. मी लिहून दिलेली औषधे वेळेत खा एवढे सांगून डॉक्टर जायला निघाले. रेगे वहिनी डॉक्टरांचे पुन्हा पुन्हा आभार मानत होत्या.

थोड्या वेळाने रेग्यांना थोडाफार आराम पडला. रेगे वहिनींच्या जीवात जीव आला. त्यांनी मुलीला पुन्हा फोन लावला. आता मात्र मुलीने फोन उचलला रेगेवहिनी म्हणाल्या, अगं अनिता तू कुठे आहेस? तुला मी कधीपासून फोन करत होते परंतु तुझा फोन नॉट रिचेबल येत होता. आईचा फोन ऐकून रेग्यांची मुलगी ही काळजीत पडली. तिने विचारले, आई तुम्ही सर्व व्यवस्थित आहात ना? का फोन केला होतास? तसे रेगेवहिनी रडकुंडीला येत म्हणाल्या, अगं तुझ्या बाबांची तब्येत अचानक बिघडली पण तू काळजी करू नकोस. डॉक्टरांनी इंजेक्शन, औषध दिल्याने आराम पडला आहे. आपल्या कुलकर्णी आणि पाठक भाऊजींनी खूपच मदत केली. ऑफिस सुटल्यावर तू आरामात ये. सगळे काही ठीक आहे अनितालाही बाबांची तब्येत ठीक असल्याचे ऐकून बरे वाटले. तिने आईला ऑफिस सुटल्यावर येते असे सांगत फोन खाली ठेवला. रेग्यांना औषधामुळे झोप लागली. तसे कुलकर्णी आणि पाठक त्यांना म्हणाले, वहिनी तुम्ही काही खाल्ले आहे का? त्यांनी नाही असे सांगताच कुलकर्णींनी आपल्या पत्नीला फोन करून रेगे पतीपत्नीसाठी जेवण घेऊन यायला सांगितले.

चौघांचीही आर्थिक परिस्थिती चांगली असल्याने त्यांनी घरकामासाठी मोलकरणी ठेवल्या होत्या. पुढील पंधरा मिनिटात कुलकर्णीबाई गरम गरम जेवणाचा डबा घेऊन पोहोचल्या.

रेग्यांनाही जाग आली होती. सर्वांनी आग्रह करून रेगे पती-पत्नींना जेवण खायला लावले. दोघांच्या डोळ्यातून अश्रू पाझरत होते. आपल्या मित्रांची आज आपणास किती मदत झाली याचा विचार मनात येऊन रेग्यांनी आपले हात जोडले आणि म्हणाले, अरे दोस्तांनो, फार धन्यवाद! आज तुम्ही नसता तर माझी अवस्था फार बिकट झाली असती. तुमचे उपकार मी कधीच विसरणार नाही. तसे तिघेही दोस्त म्हणाले, अहो रेगे, धन्यवाद कसले करताय! आपण एकमेकांसाठी नाही करायचे तर कोणी करायचे? वेळ आणि प्रसंग सर्वांवर येऊ शकतो. पाठक म्हणाले, गेल्या वर्षी माझ्या पत्नीची तब्येत खराब झाली तेव्हा तुम्ही किती पळापळ केली होती आणि कुलकर्णींचा बाईक अपघात झाला तेव्हा आपणच त्यांना डॉक्टरांकडे नेले होते. एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ असे म्हणून रेगे पती-पत्नींना आराम करायला सांगून सर्वजण आपापल्या घरी गेले.

रेगे पती-पत्नी आपल्या मित्रांच्या सहकार्याने भारावून गेले होते. आज रेग्यांना हृदयविकाराचा लहान झटका येऊन गेला होता पण प्रसंगावधान राखून पत्नीने डॉक्टरांना फोन केल्याने त्यांचे जीवावरचे संकट टळले होते. तसे मित्र आणि त्यांच्या बायकांनी त्यांना जेऊ घातले, सांत्वन केले. रेग्यांच्या डोळ्यांतून अश्रू पाझरत होते. ते आपल्या पत्नीचा हात हातात घेऊन म्हणाले, रेणू आज तुझ्यामुळे माझा जीव वाचला. तुझे मानावेत इतके उपकार कमीच! तसे रेगे बाई म्हणाल्या, अहो उपकार कसले? मी तर माझे कर्तव्यच केले. माझ्या कुंकवासाठी मी इतकेही नाही करायचे तर मनुष्य धर्माचा उपयोग काय? भारावलेल्या मनाने दोघे बसले असतानाच अनिता, त्यांची मुलगी धापा टाकतच घरी पोहोचली. आपल्या बाबांना सुखरूप पाहून ती आनंदाने आईच्या गळ्यात पडून रडू लागली. तिचे डोळे पुसत रेणुताई म्हणाल्या, अग वेडे! आता तुझे बाबा ठणठणीत आहेत मग रडतेस कशाला? डोळे पूस आणि काहीतरी खाऊन घे अनिताने येताना आईबाबांसाठी फळे, मिठाई, ड्रायफ्रूट्स आणले होते. ते आपल्या हाताने तिने बाबांना भरवले. आपल्या लेकीचे आपल्यावरील प्रेम पाहून वृद्ध दांपत्य सुखावले. मुलगी जन्माला आली तेव्हा वंशाला दिवा नाही म्हणून अनेक लोकांनी रेग्यांना टोमणे मारले होते पण आज तीच मुलगी वृद्ध आई-वडिलांची तब्येत बरी नसल्याचे कळताच धावत आली होती. आपल्या आई-बाबांची ती काठी झाली होती. रेणूताईंना आपल्या लेकीचा खूप अभिमान वाटला.आपल्या जीवनाचे सार्थक झाले असे वाटत त्यांनी पदराने आपले डोळे पुसले आणि तिला खाण्यासाठी काही बनवावे म्हणून उठून स्वयंपाकघरात गेल्या.

**-सौ. भारती सावंत**
खारघर, नवी मुंबई
मो. ९६५३४४५८३५

# अहमदपुरातील बारवर चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर आयजी पथकाची कारवाई

## सोळा जुगाऱ्यांना अटक, सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** – अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी नांदेड परिक्षेत्रात कार्यरत विशेष पथकाने लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथे एका बारच्या दुसऱ्या मजल्यावर सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर कारवाई केली. यावेळी १६ जुगाऱ्यांना अटक करून सहा लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शनिवार, दि. २५ एप्रिल रोजी पथकाने अहमदपूर तालुक्यातील काजळ हिप्परगा येथील विसावा बारच्या दुसऱ्या मजल्यावर छापा टाकला. या छाप्यात तिर्रट नावाचा जुगार खेळताना १६ जुगारी मिळून आले. त्यांना ताब्यात घेऊन, त्यांच्याकडून १ लाख ४४ हजार ७५० रुपयांची रोकड, १ लाख ३ हजारांचे १४ मोबाईल व ३ लाख ४० हजार रुपयांच्या ६ मोटारसायकली असा एकूण ५ लाख ८७ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यांच्याविरुध्द अहमदपूर पोलीस ठाणे येथे गुरनं २३३/२०२६ कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



या प्रकरणाचा तपास अहमदपूर पोलीस ठाण्यातील पोउपनि स्मिता जाधव यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह हवालदार प्रदीप खानसोळे, संजीव जिंकलवाड, अंमलदार गणेश धुमाळ व कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन करून त्यांना प्रोत्साहित केले आहे.

**'खबर' हेल्पलाईनवरून माहिती द्या**

परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी, पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने 'खबर' नावाची हेल्पलाईन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागात चालणाऱ्या अवैध व्यवसायांची माहिती ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेल्या 'खबर' या हेल्पलाईनवर फोन करून अथवा व्हॉट्सअप मेसेजद्वारे द्यावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# कॅनालवरील अरुंद पुलामुळे अपघातांची मालिका; रुंदीकरणासह तत्काळ उपाययोजना करा -खा. आष्टीकर



**हदगाव (प्रतिनिधी)** – तालुक्यातील मौजे हडसणी येथे हदगाव ते तामसा या मार्गावर असलेल्या कॅनालवरील अरुंद पुलामुळे दररोज अपघात घडत आहेत. नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर पुलाची रुंदी वाढवून नवीन बांधकाम करण्यासह तातडीने उपाययोजना करण्याची मागणी खा. आष्टीकर यांनी केली आहे.

सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तयार करण्यात आला असला, तरी कॅनालवरील पुलाची रुंदी मात्र रस्त्याच्या प्रमाणात करण्यात आली नाही. परिणामी या अरुंद पुलावरून वाहनांची ये-जा करताना वारंवार अपघात होत असून, अनेकांना जीव गमवावा लागल्याच्या घटना समोर आल्या आहेत. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र रोष व्यक्त होत आहे.

या संदर्भात खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी नांदेड जिल्हा दिशा सनियंत्रण समितीच्या बैठकीतही हा मुद्दा उपस्थित केला असून, हडसणी फाट्यावर होणारे अपघात रोखण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत.

दरम्यान, संबंधित विभागाने तत्काळ स्थळ पाहणी करून पुढील उपाययोजना कराव्यात, अशी मागणी देखील करण्यात आली आहे.

कॅनालवरील पुलाचे रुंदीकरण व नवीन बांधकाम, हडसणी फाट्यावर दिशादर्शक फलक बसविणे, हदगाव व तामसा मार्गावर दोन्ही बाजूंनी गतिरोधक उभारणे, श्री दत्त कॉलेजसमोर दोन्ही बाजूंनी गतिरोधक बसविणे आदी मागण्या खा. आष्टीकर यांनी अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ नांदेड तसेच उपपैनगंगा मंडळ नांदेड यांच्याकडे करण्यात आली असून, सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग विभागालाही याबाबत योग्य कार्यवाही करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्थानिक नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या या समस्येकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा, असे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी सांगितले.

# एमजीएममध्ये इंग्रजी भाषा कौशल्य विकास कार्यक्रम संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)** – एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयातील इंग्लिश लँग्वेज क्लबतर्फे प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी नुकताच इंग्रजी संभाषण कौशल्य विकास कार्यक्रम महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनात क्लबचे अध्यक्ष प्रा. डॉ. चंदनकुमार सोमवंशी यांनी आयोजित केला.

या क्लबतर्फे विद्यार्थ्यांचे इंग्रजी संभाषण कौशल्ये वाढविण्यासाठी वर्षभर विविध कार्यक्रम घेण्यात येतात. याचाच एक भाग म्हणून हाऊ टू इंप्रूव्ह इंग्लिश कम्युनिकेशन स्कील्स हा कार्यक्रम घेण्यात आला. साधन व्यक्ती म्हणून आयटीएम कॉलेजचे अनुभवी तज्ज्ञ डॉ. सतीश कोकाटे उपस्थित होते. महाविद्यालयातर्फे प्रथमवर्ष प्रमुख प्रा. नारायण कदम यांनी पाहूण्यांचे फुले देऊन स्वागत केले. तर डॉ. चंदनकुमार सोमवंशी यांनी पाहूण्यांची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली.

यावेळी प्रा. राहुलकुमार शर्मा, प्रा. पंकज पवार, प्रा. मुरारी पावडे, प्रा. सुहास साळवे. प्रा. खरबे आदींची उपस्थिती होती. विद्यार्थिनी अंशिका तेहरा हिने सूत्रसंचालन केले तर डॉ. चंदनकुमार सोमवंशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# यशवंत महाविद्यालयात भारत एन्व्हायरमेंट प्रोग्राम सप्ताहाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – यशवंत महाविद्यालयात रिसर्च हाईट्स फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली व ई.पी.टी. आर.आय.च्या सहकार्याने पृथ्वी दिनानिमित्त आयोजित भारत एन्व्हायरमेंट प्रोग्राम-भारत सस्टेनेबल कॅम्पस मिशन २०२६ मध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे. महाविद्यालयाच्या वतीने भारत एन्व्हायरमेंट प्रोग्राम सप्ताहाचे दि.२२ ते २९ एप्रिल या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे.

माजी प्र-कुलगुरु प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार हा उपक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विविध अशा आठ समित्यांची




निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये डॉ. रमेश चिल्लावार, डॉ. बी. बालाजीराव, डॉ. एम. एम.व्ही. बेग, डॉ. कैलास इंगोले, डॉ. राजरत्न सोनटक्के, प्रा. संतोष राऊत, प्रा. प्रियंका सिसोदिया, डॉ. प्रवीणकुमार मिरकुटे व डॉ. मदन अंभोरे यांचा समावेश आहे तर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयीका डॉ. एल. व्ही. पद्माराणी राव मार्गदर्शन करीत आहेत.

अर्थ वीक(२२ ते २९ एप्रिल) दरम्यान पर्यावरण जनजागृती, जबाबदार वर्तन व विद्यार्थी सहभाग, विविध सस्टेनेबिलिटी उपक्रम राबविण्यात येत आहेत. कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग नोंदवणे, त्यांच्यामध्ये पर्यावरण संवर्धन व हवामान बदलाची बांधीलकी निर्माण करणे हे प्रमुख उद्दिष्ट असून हा उपक्रम विकसित भारताच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे आणि संयुक्त राष्ट्र विकास उद्दिष्टांना पूरक आहे. या उपक्रमांच्या यशस्वीरित्या आयोजनातून यशवंत महाविद्यालय शाश्वत विकास व विद्यार्थी केंद्रित सामाजिक बांधीलकी दर्शवितो.

# डी. के. पाटील इन्स्टिट्यूटमध्ये जागतिक मलेरिया दिन साजरा




**लोहा (प्रतिनिधी)** – जागतिक मलेरिया दिनानिमित्त डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे जनजागृती या अनुषंगाने Driven to End Malaria: Now We Can. Now We Must. या घोषवाक्याखाली कार्यक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमात मलेरिया हा प्रतिबंध करता येण्याजोगा आजार असून, घराच्या परिसरात स्वच्छता राखणे, पाण्याचे साठे होऊ न देणे, मच्छरदाणीचा वापर करणे, तसेच आवश्यकतेनुसार औषधोपचार घेणे यावर भर दिला. याशिवाय शासनाच्या राष्ट्रीय मलेरिया नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती प्रा. ए. बी. थोरात यांनी विद्यार्थ्यांना दिली. उपस्थितांचे आभार प्रा. पी. जी. देसाई यांनी मान ले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पी. पी. आलाबदे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बुद्ध-भीम महोत्सव समितीच्या वतीने 'बुद्ध पहाट'चे ३० एप्रिल रोजी आयोजन



**नांदेड (प्रतिनिधी)** –तथागतांच्या धम्माचे चक्र गतिमान करण्यासाठी भगवान बुद्धांच्या २५८९ व्या जयंतीनिमित्त बुद्ध-भीम महोत्सव समिती नांदेडच्या वतीने याही वर्षी वैशाख पौर्णिमेला बुद्ध पहाटचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवार, दि. ३० एप्रिल रोजी पहाटे पाच वाजता डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह नांदेड येथे नागपूर येथील सुप्रसिद्ध जाधव सिस्टर्स यांच्या सुरेल बुद्ध-भीम गीतांची नांदेडकरांना मेजवानी मिळणार आहे.

तथागत भगवान बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त गेल्या १७ वर्षापासून बुद्ध-भीम महोत्सव समितीच्या वतीने बुद्ध पहाटचे आयोजन करण्यात येते. नांदेडमध्ये बुद्ध पहाटची सुरुवात करणाऱ्या बुद्ध-भीम महोत्सव समितीने गेल्या १७ वर्षात देशातील अनेक नामवंत गायकांच्या संगीतमय बुद्ध गीतांच्या कार्यक्रमांचे आयोजन करून बुद्ध पहाटचे यशस्वी नियोजन केले.

बुद्ध पहाटचे हे १७ वे वर्षे असून, यावर्षी गुरुवार, दि. ३० एप्रिल रोजी मिलिंद जाधव नागपूर प्रस्तुत जाधव सिस्टर्स बुद्ध-भीम गीतांचा अनोखा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावेळी श्रीलंका आणि छत्रपती संभाजी नगर येथील भिक्खू संघाची धम्मदेशना व पूजापाठ आयोजित केली आहे. बुद्ध पहाट या संगीतमय कार्यक्रमास बौद्ध बांधवांनी शुभ्र वस्त्र परिधान करून उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# नांदेडमध्ये जागतिक हिवताप दिन उत्साहात

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेडमध्ये जागतिक हिवताप दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी मनपा अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. अमृत चव्हाण, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. हनुमंत रिठे, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बद्दीओदीन यांच्या हस्ते जागतिक हिवताप दिन महात्मा गांधी पुतळा पासून ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत रॅली काढण्यात आली.

यावेळी सहायक अधीक्षक विजय चव्हाण, आरोग्य पर्यवेक्षक संजय भोसले, गंगाधर गनलेवार, आरोग्य निरीक्षक माधव कोल्हे, सत्यजीत टिप्रेसवार, व्यंकटेश पुलकंठवार, बालाजी निलपत्रेवार, अरुण आळणे, सुरेश आरगूलवार, मनोहर खानसोळे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी विलास नाईक, सचिव दळवी, राजू शेट्टे, वैभव कौशल्ये, आरोग्य कर्मचारी पुष्पराज राठोड, गणेश भुसा, प्रभाकर मुंगल, व्यंकटी बकाल, भारत हाम्पले, उत्तम कराड, व्यंकट मोरे, अनिल सूर्यवंशी, यासीन शेख, चंद्रभान धोंडगे, सुनिल बगाटे, विष्णूदास गलपवाड, संजय कळसे, रणखांब, पवार, देविदास पेंढारकर, भीमराव राठोड, शेख खलील, कैलास कुंटुरवार, परमेश्वर स्वामी मठदेवरु, लिपिक पांडुरंग बोरकर, क्षेत्र कर्मचारी यांच्यासह असंख्य कर्मचारी रॅलीत सहभागी होते. व्यंकटेश पुलकंठवार यांनी डास निर्मूलन प्रतिज्ञा देऊन रॅलीचा समारोप केला.

# सिडको परिसरात माता वासवी जन्मोत्सव सोहळा व शोभा यात्रा उत्साहात

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – वासवी व वनिता क्लब सिडकोच्या वतीने २६ एप्रिल रोजी माता वासवी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्ताने भव्य शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिला दांडीया, आतीषबाजी व ढोलताशांच्या गजरात ही मिरवणूक उत्साहात संपन्न झाली.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी २६ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता माता वासवी जन्मोत्सव सोहळा निमित्ताने वासवी व वनिता क्लब यांच्या वतीने भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. ही शोभायात्रा श्री बालाजी मंदिर देवस्थान आनंदनगर सोसायटी



हडको येथून ज्ञानेश्वरनगर - पाण्याची टाकी, छ. शिवाजी महाराज चौक, डॉ. रायेवार हॉस्पिटल समोरुन शिवमंदिर, कुसुमताई हायस्कूल, संभाजी चौक, नाईक कॉलेज मार्गे वासवी माता मंदिर वासवी भवन सिडको येथे या यात्रेचा समारोप झाला.

या यात्रेच्या समारोप प्रसंगी माता वासवी यांची महाआरती करण्यात आली. या शोभा यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी वासवी क्लबचे अध्यक्ष संदीप येरावार, सचिव बालाजी कवटीकवार, कोषाध्यक्ष श्रीनिवास येरावार, वनिता क्लबच्या अध्यक्षा सौ. कोमल संदीप येरावार, सचिव सौ. सुनिता बालाजी कवटीकवार, कोषाध्यक्ष सौ. सविता श्रीनिवास येरावार तसेच वासवी क्लब व वासवी वनिता क्लबचे सर्व आजी, माजी पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## येत्या पावसाळ्यात ५१ हजार वृक्ष लागवड

# लोहा शहर हरित व स्वच्छ करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची गरज - आ. प्रतापराव पाटील चिखलीकर

**लोहा (प्रतिनिधी)** – लोहा शहर हरित व स्वच्छ झाले पाहिजे. त्यातही सर्वपक्षीय नेत्यांची, कार्यकर्त्यांची व शहरातील जनतेची साथ पाहिजे, तेव्हा येत्या पावसाळ्यात शहरातील सर्वच भागात ५१ हजार वृक्ष लागवड करण्याचा व तो टिकविण्याची मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी शाळा-महाविद्यालये तसेच वृक्षप्रेमी यांचे सहकार्य लागणार आहे. लोहा शहर हरित शहर- स्वच्छ शहर व्हावे यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करू, असा विश्वास विधीमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष आ. प्रतापराव पाटील चिखडीकर यांनी व्यक्त केला

लोहा शहरात शनिवार, २५ एप्रिल रोजी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते एक कोटी रुपयांच्या विकास कामाचा शुभारंभ



झाला. ज्यात प्रभाग एक सायाळ रोड ते मारोती मंदिर सीसी रस्ता ३० लक्ष रुपये, प्रभाग सहा शिक्षक कॉलनी २५ लक्ष रुपये, सीसी रोड व नाली १० लक्ष रुपये, श्रीकृष्ण मंदिर सभागृह तर प्रभाग दहा जुन्या शहरात ५० लक्ष रुपयांच्या सिमेंट रस्त्याचे भूमिपूजन पार पडले. नगराध्यक्ष शरद पवार, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी नगराध्यक्ष केशवराव मुकदम, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, माजी उपनगराध्यक्ष दता वाले, माजी उपसभापती बालाजी पाटील, छत्रपती धुतमल, शिउबाठा तालुका प्रमुख भीमराव पाटील शिंदे, ऋषी पाटील, गटनेते भास्कर पवार, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, श्याम पाटील पवार, बालाजी खिल्लारे, नगरसेवक सदाशिव तेलंग, पार्वतीबाई जंगले, लक्ष्मी धुतमल, पूजा खिल्लारे, सुशीलादेवी परिहार, भागावाई पवार, माधुरी बोडके, सौ. मांजलवाड, सुशीलाबाई कहाळेकर, अविनाश पवार, गणेश बगाडे, तुकाराम दाढेल, सतीश निखाते, नामदेव पाटील पवार, बी. डी. जाधव, मारुती पाटील बोरगावकर, अणासाहेब पवार, माजी नगरसेवक बालाजी भोसीकर, गंगाधर महाबळे यांच्यासह सर्व नगरसेवक, आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी आ. प्रतापराव पाटील म्हणाले की, लोहा शहर हरित व स्वच्छ राहण्यासाठी सर्व पक्षीयांची तसेच नागरिकांची साथ पाहिजे. येत्या पावसाळ्यात शहराच्या आजूबाजूला व शहरात जेथे शक्य आहे तेथे वृक्ष लागवड करावी. शाळा-महाविद्यालय यांचा सहभाग घ्यावा.

# किनवटमध्ये मोफत दंत तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**किनवट (प्रतिनिधी)** – भारत जोडो युवा अकादमी संचालित साने गुरुजी इमर्जन्सी अँड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, एमआयडीसी, कोठारी, किनवट येथे प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या मोफत दंत रोग तपासणी व उपचार शिबिराला रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ रोजी हे शिबीर हॉस्पिटलचे संचालक डॉ. अशोक बेलखोडे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आले होते. ग्रामीण भागातील रुग्णांना दंत उपचारांसाठी मोठ्या शहरात जावे लागू नये, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा अनेक रुग्णांनी लाभ घेतला.

या शिबिरामध्ये सुप्रसिद्ध दंत तज्ज्ञ डॉ. विक्रम बेलखोडे तसेच मानसी व्यवहारे, डॉ. विद्या गोलकोंडावार यांनी रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन केले. यावेळी साने गुरुजी हॉस्पिटलमधील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. भाग्यश्री बेलखोडे वरटकर, डॉ. योगेंद्र वरटकर, डॉ. दुर्गा काकडे, डॉ. शिवानी बेलखोडे व बाबासाहेब सूर्यवंशी उपस्थित होते. शिबिरात रूट कॅनल ट्रीटमेंट, दातांच्या रंगाची फिलिंग, कृत्रिम दात (कवळी) बसविणे, अक्कलदाढ शस्त्रक्रिया, तसेच क्लिप (ब्रेसेस) लावून वेडेवाकडे दात सरळ करण्याबाबत रुग्णांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दुर्गा काकडे यांनी केले. शिबिराचे प्रास्ताविक डॉ. विद्या गोलकोंडावार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अजय जाधव यांनी मानले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी साने गुरुजी इमर्जन्सी अँड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमधील सर्व कर्मचारी वृंदाचे मोलाचे योगदान लाभले.

# प्रगतीमंत्र

## डीआरडीओमध्ये 6 महिन्यांची पगारी इंटर्नशिप, 30,000 रुपयांसोबत प्रमाणपत्रही मिळणार!

**भारतातील सर्वात मोठ्या संशोधन संस्थांपैकी एक असलेल्या संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेत (DRDO) काम करणे किंवा नोकरी मिळवणे हे अनेकांचे स्वप्न असते. जर तुम्ही सध्या कॉलेजमध्ये असाल, तर तुम्ही ही उत्तम संधी मिळवू शकता. डीआरडीओ दिल्ली आणि हल्द्वानीसाठी प्रतिभावान इंटर्नच्या शोधात आहे. पात्र उमेदवारांना नोंदणीसाठी विनंती करणारी सूचना अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. शिक्षण पूर्ण केल्यावर लगेचच आपल्या करिअरमध्ये प्रगती करू इच्छिणारे विद्यार्थी येथे इंटर्नशिप करून मौल्यवान अनुभव मिळवू शकतात. या कालावधीत डीआरडीओ मानधनदेखील देईल. ही ६ महिन्यांची इंटर्नशिप विनामूल्य नसून, सशुल्क आहे.**




### इंटर्नशिप निवड प्रक्रिया

उमेदवारांची निवड गुणवत्ता/फिजिकल किंवा ऑनलाइन संवादाच्या आधारावर केली जाईल. कोणतीही लेखी परीक्षा होणार नाही. जर दोन उमेदवारांना समान गुण मिळाले तर जन्मतारखेनुसार (वयाने मोठे असलेल्याला) प्राधान्य दिले जाईल. या इंटर्नशिपसाठी निवड झालेल्या उमेदवारांना ईमेलद्वारे सूचित केले जाईल. अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या प्राचार्यांकडून कॉलेजच्या लेटरहेडवर NOC सादर करावे लागेल.

भारत सरकारने डीआरडीओच्या डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ सायकॉलॉजी अँड एल्ड सायन्सेस (DIPAS) येथील हल्द्वानी रिसर्च सेल (DIBER) साठी या इंटर्नशिपची घोषणा केली आहे. २०२६-२७ शैक्षणिक सत्रातील बीई/बीटेक आणि एमई/एमटेकच्या अंतिम वर्षातील विद्यार्थी अर्ज करू शकतात. इंटर्नशिपद्वारे भरलेल्या जागांची संख्या ठिकाणानुसार तपासता येईल.

| विषय | ठिकाण आणि रिक्त जागा |
|---|---|
| मेकॅनिकल इंजिनिअरिंग | DIPAS, दिल्ली - 02<br>DIBER, हल्द्वानी-01 |
| कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग | DIPAS, दिल्ली - 01 |
| इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग | DIPAS, दिल्ली- 01<br>DIBER, हल्द्वानी-01 |
| इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग | DIBER, हल्द्वानी -02 |

### स्टायपेंड किती?

ही DRDO इंटर्नशिप ६ महिन्यांची असेल, जी अंदाजे १ जुलै २०२६ पासून सुरू होईल. तुम्हाला संपूर्ण कालावधीसाठी ३०,००० रुपयांचे विद्यावेतन मिळेल. हे दोन हप्त्यांमध्ये दिले जाईल. पहिल्या ३ महिन्यांनंतर तुम्हाला १५,००० मिळतील. उर्वरित कालावधी पूर्ण झाल्यावर तुम्हाला उर्वरित १५,००० रुपयांचे विद्यावेतन मिळेल. विद्यार्थ्यांनी दरमहा किमान १५ दिवस इंटर्नशिपमध्ये सक्रिय राहणे आवश्यक आहे. या कालावधीत त्यांना निवास, भोजन आणि प्रवासाची स्वतःची व्यवस्था करावी लागेल. जे विद्यार्थी संपूर्ण ६ महिन्यांची इंटर्नशिप पूर्ण करणार नाहीत, त्यांना प्रमाणपत्र मिळणार नाही.

### अर्ज कसा करावा?

तुम्हाला या इंटर्नशिपसाठी ऑफलाइन अर्ज सादर करावा लागेल. तुम्ही https://drdo.gov.in/drdo/en/offerings/vacancies येथून अर्ज डाउनलोड करू शकता. या फॉर्ममध्ये तुमचा सर्व तपशील मोठ्या अक्षरात (capital letters) भरा. तुमचे नाव, कॉलेज आणि विद्यापीठाचे नाव, गुण, संपर्क क्रमांक, ईमेल आयडी आणि तारखा पूर्ण भरा. तुम्ही खाली तुमचे सत्रनिहाय गुण देखील नमूद करणे आवश्यक आहे. या फॉर्मवर खाली प्राचार्यांची सही आणि कॉलेजचा शिक्का मारून घ्या. तुम्ही अर्जासोबत तुमचे आधार कार्ड, कॉलेज आयडी, बोनाफाईड प्रमाणपत्र आणि गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे. सर्वात वर तुमचा फोटो लावा. लिफाफ्यावर Application for Paid Internship with Discipline असे नमूद करायला विसरू नका. हा फॉर्म संचालक, डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ सायकॉलॉजी अँड अलाइड सायन्सेस, डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन, भारत सरकार, संरक्षण मंत्रालय, लखनौ रोड, तिमारपूर, दिल्ली-११०५४ या पत्त्यावर पाठवा. या इंटर्नशिपसाठी अर्ज भरण्याची अंतिम मुदत १५ मे २०२६ आहे. अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेले किंवा अपूर्ण वा चुकीची माहिती असलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

## एक मच्छर साला...

## मच्छरांना पळवून लावण्याच्या नादात भारतीयांनी फुकले 3,788 कोटी रुपये!

### कंपन्यांचा व्यवसाय वाढतोय वेगाने...

**भारतात तापमान वाढत असताना डासांची संख्याही वाढली आहे. डासांच्या चाव्यामुळे होणारे आजार टाळण्यासाठी लोक विविध उत्पादने वापरत आहेत. यामुळे भारतातील डास प्रतिबंधक बाजारपेठेच्या जलद वाढीला चालना मिळत आहे. Grand View Research & Horizon Databook च्या ताज्या अहवालानुसार, २०२५ मध्ये भारतातील डास प्रतिबंधक उत्पादनांची एकूण उलाढाल अंदाजे ४०२ दशलक्ष डॉलर्स (अंदाजे ३७८८ कोटी रुपये) आहे. ही वाढ आणखी होण्याची अपेक्षा आहे.**



### 8% वार्षिक वाढ

- २०३३ पर्यंत भारतातील डास प्रतिबंधक उत्पादनांची एकूण उलाढाल ७५५ दशलक्ष डॉलर्सपर्यंत पोहोचेल.
- २०२६ ते २०३३ दरम्यान या क्षेत्रात अंदाजे ८% चक्रवाढ वार्षिक वाढ (CAGR) अपेक्षित आहे.
- २०२५ मध्ये जागतिक कीटक प्रतिबंधक बाजारपेठेत भारताचे योगदान ६.७% होते.

### ही किंमत का वाढत आहे?

डासांचा उपद्रव आता केवळ गैरसोयीचा स्रोत राहिलेला नाही, तर ते एक गंभीर आरोग्य संकट बनले आहे. लोक स्वतःच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी या उत्पादनांना अत्यावश्यक मानत आहेत. डासांमुळे डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया, झिका व्हायरस आणि जपानी एन्सेफलायटीस यांसारख्या आजारांचा धोका सातत्याने वाढत आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार (WHO), भारतातील ९५% लोकसंख्या मलेरिया-प्रवण भागात राहते. एका अहवालानुसार, जगभरात दरवर्षी डासांच्या चाव्यामुळे अंदाजे १० लाख लोकांचा मृत्यू होतो. संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार, आग्नेय आशियातील मलेरियाच्या एकूण प्रकरणांपैकी ७५% प्रकरणे एकट्या भारतातच आढळतात. संध्याकाळ होताच डासांचा होणारा हल्ला लोकांना घरातच थांबण्यास किंवा बाजारात उपलब्ध असलेल्या कॉइल्स, स्प्रे, क्रीम्स आणि लिक्विड व्हेपोरायझर्ससारख्या अधिक महागड्या पर्यायांचा अवलंब करण्यास भाग पाडतो.

# विना IIT-NIT गुगलमध्ये कशी मिळाली 80 लाखांची नोकरी?

## कोलकात्याच्या तरुणाने उलगडला 'सक्सेस'चा 'गोल्डन रूल'!

**कोणीतरी योग्यच म्हटले आहे, की यशासाठी कोणताही शॉर्टकट नाही; ते केवळ कठोर परिश्रम करणाऱ्या आणि संघर्ष करणाऱ्यांचेच नशिबात असते. एका सामान्य विद्यार्थ्यापासून ते गुगलमध्ये उच्च पगाराच्या नोकरीपर्यंतचा कोलकात्याच्या तरुणाचा प्रवास याचे एक जिवंत उदाहरण आहे. अर्का मजूमदार असे या तरुणाचे नाव असून, त्याने कोणत्याही प्रतिष्ठित आयआयटी किंवा एनआयटीमध्ये शिक्षण घेतले नाही. तरीही त्याने तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपनी गुगलमध्ये लाखो रुपयांचे पगाराचे पॅकेज मिळवले आहे.**






### बारावीत फक्त 69% गुण

अर्का लहानपणापासूनच एक चांगला विद्यार्थी होता. पण त्याची गुणवत्ता पातळी सर्वसाधारण होती. त्याला बारावीच्या बोर्ड परीक्षेत ६९% गुण मिळाले. त्याला गणितात फक्त ४३ गुण मिळाले, जे उत्तीर्ण होण्याच्या गुणांपेक्षा थोडेच जास्त होते. एखाद्या मोठ्या IT, IIIT किंवा NIT मध्ये प्रवेश मिळवण्यासाठी बारावीत चांगले गुण असणे आवश्यक असते. मोठ्या संस्थेत प्रवेश मिळवण्यासाठी अर्काला इंटरमिजिएटमध्ये पुरेसे गुण मिळाले नाहीत.

- छोट्या शहरातील महाविद्यालयात शिक्षण : अर्काने २०१७ मध्ये कूचबिहार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि संगणकशास्त्रात बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी (बीटेक) पदवी मिळवली. छोट्या शहरातील महाविद्यालयांमधून आलेल्यांसाठी लगेचच मोठ्या कंपनीत प्रवेश मिळवणे कठीण असते. त्याला अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो.
- अनेक महिने नकारांचा सामना : महाविद्यालय सोडल्यानंतर नोकरी शोधणे सोपे नव्हते. त्याने अनेक महिने विविध कंपन्यांमध्ये अर्ज केले. पण त्याला सतत नकार मिळत राहिले. तरीही, त्याने हार मानली नाही. काही काळानंतर त्याला टीसीएसमध्ये शिकण्याची संधी मिळाली. टीसीएस-डिजिटलमध्ये Tata Neu ॲपच्या आर्किटेक्चरची पुनर्रचना करण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच्या कामामध्ये आवश्यक कार्यक्षमता लागू करणे आणि गूगल क्लाउड फंक्शन्सवर आधारित नोटिफिकेशन सिस्टम तयार करणे यांचा समावेश होता.
- चक्क गुगलमध्ये नोकरी : अर्काला टीसीएसमध्ये दरमहा २२,००० रुपये पगार मिळत होता. त्याच्या स्वप्नांसाठी हा पगार खूपच कमी होता. मग २०२५ साल उजाडले, जे अर्का मजुमदारच्या आयुष्यातील आतापर्यंतचे सर्वात मोठे वळण ठरले. सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटमधील चार वर्षांपेक्षा जास्त अनुभवानंतर त्याला गुगलच्या अँड्रॉइड कोअर टीमने नोकरीवर घेतले. त्याने गुगल करिअर्स वेबसाइटवरून अर्ज केला होता. चार महिन्यांनंतर गुगलच्या एका रिक्रूटरने त्याच्याशी संपर्क साधला आणि त्याचा रेझ्युमे शॉर्टलिस्ट झाल्याचे कळवले. गुगलची निवड प्रक्रिया सुरू झाली. त्याने फोनवर स्क्रीन टेस्ट, प्रत्यक्ष मुलाखत आणि Googlyness फेरी पार पाडली. यात त्याला ४५ मिनिटांसाठी परिस्थितीवर आधारित आणि प्रोजेक्टवर आधारित प्रश्न विचारण्यात आले.
- अर्का मजुमदारचा यशाचा गोल्डन रूल :अर्का मजुमदार म्हणतो, की नशीब किंवा रातोरात यश मिळत नाही, फक्त एक स्पष्ट आराखडा, संयम आणि रोजची मेहनत लागते. तो सांगतो, की कॉम्प्युटर सायन्समध्ये पदवी मिळवल्यानंतर तो कंपन्यांमध्ये अर्ज करत होता आणि त्याला नकार मिळत होता. असे असूनही त्याने शिकणे कधीच थांबवले नाही. तो आपली कौशल्ये विकसित करत राहिला. त्याने अँड्रॉइड डेव्हलपमेंट, जावा, कोटलिन आणि क्लाउड कंप्युटिंगमध्ये सर्टिफिकेशन कोर्सेस केले. तो लवकर शिकण्यात आणि समस्या सोडवण्यात पारंगत झाला. त्याने लीटकोडवर ८०० हून अधिक आव्हाने सोडवली. या निर्णयांनी अर्काला जो ३.२ लाख रुपये वार्षिक पगारावर काम करत होता तिथे थेट गुगलमध्ये ८० लाख रुपयांच्या वार्षिक पगारापर्यंत पोहोचण्यास मदत केली. त्याची कहाणी हे दाखवते की, जे स्वतःवर विश्वास ठेवतात आणि कठोर परिश्रम करतात, ते एक दिवस आपले ध्येय नक्कीच साध्य करतात.

## गल्लीतल्या दुकानामुळे सुचली कल्पना!

# 'हा' व्यवसाय सुरू करण्यासाठी 30 लाखांची नोकरी सोडली, आता करोडोंचे लक्ष्य...

**गुंजन परमार हे गुजरातच्या सुरेंद्रनगरचे रहिवासी आहेत. त्यांनी अगदी कमी वेळात 'द लॉन्ड्री पोस्ट' नावाचा एक यशस्वी स्टार्टअप उभा केला आहे. परिसरातील एका साध्या लॉन्ड्री दुकानाची आर्थिक क्षमता पाहून त्यांना ही कल्पना सुचली. यानंतर, त्यांनी वर्षाला ३० लाख रुपये कमावणारी आपली कॉर्पोरेट नोकरी सोडली. हा एक तंत्रज्ञानावर आधारित लॉन्ड्री आणि फॅब्रिक केअर ब्रँड आहे. जो लॉन्ड्री, ड्राय क्लीनिंग, इस्त्री करणे आणि घरातील कापड (जसे की पडदे, सोफा कव्हर्स इत्यादी) स्वच्छ करणे यांसारख्या सेवा देतो. आज हा व्यवसाय अहमदाबादस्थित ब्रँड एक जीवनशैली सेवा बनला आहे. २०२६ च्या अखेरपर्यंत ११.५ कोटींचा महसूल मिळवण्याचे त्याचे लक्ष्य आहे. गुंजन परमार यांच्या यशाच्या प्रवासाबद्दल जाणून घेऊया...**




### या वर्षाच्या अखेरपर्यंत 11.5 कोटींचे लक्ष्य

सुरुवातीच्या संघर्षानंतर आणि कमी महसुलानंतर, हा ब्रँड वेगाने वाढत आहे. दुसऱ्या वर्षापर्यंत, त्यांनी १८-१९ लाखांचा वार्षिक महसूल गाठला होता. २०२६ च्या अखेरपर्यंत १०० आऊटलेट्स आणि ११.५ कोटींचा महसूल मिळवण्याचे या ब्रँडचे उद्दिष्ट आहे. सध्या सुरत, गांधीनगर आणि राजकोटमध्ये सेवा देत असलेल्या गुंजन यांचे आता संपूर्ण भारतात ५०० आऊटलेट्स उघडण्याचे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर एक अग्रगण्य लॉन्ड्री ब्रँड म्हणून उदयास येण्याचे स्वप्न आहे.

### मध्यमवर्गीय कुटुंबात जन्म

गुंजन परमार यांचा जन्म गुजरातच्या सुरेंद्रनगर येथील एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे वडील एका बेअरिंग फॅक्टरीमध्ये मेकॅनिकल इंजिनिअर होते आणि त्यांची आई गृहिणी होती. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर गुंजन उच्च शिक्षणासाठी अहमदाबादला गेले. त्यांनी गुजरात विद्यापीठात इंटिग्रेटेड एमबीए प्रोग्राममध्ये प्रवेश घेतला. मार्केटिंगमध्ये सुवर्णपदक मिळवून पदवी प्राप्त केली. एक काळ असा होता की त्यांच्या आई- वडिलांकडे त्यांची कॉलेज फी भरण्यासाठी १५,००० रुपये सुद्धा नव्हते. त्यामुळे त्यांना नातेवाईकांकडून पैसे उधार घ्यावे लागले. २०१५ मध्ये शिक्षण पूर्ण झाल्यावर गुंजन एशियन पेंट्समध्ये टेरिटरी सेल्स एक्झिक्युटिव्ह म्हणून रुजू झाले. पुढील दहा वर्षांत त्यांनी कॉर्पोरेट क्षेत्रात सातत्याने प्रगती केली आणि ते कंपनीच्या सर्वात तरुण व्यवस्थापकांपैकी एक बनले. त्यांनी कंपनी सोडली तेव्हापर्यंत त्यांचा वार्षिक पगार जवळपास ३० लाख रुपयांपर्यंत वाढला होता.

### गल्लीतील दुकानामुळे सुचली कल्पना

गुंजन परमार यांचा उद्योजकतेचा प्रवास तेव्हा सुरू झाला, जेव्हा त्यांनी परिसरातील एका लॉन्ड्री दुकानाच्या मालकाची समृद्धी पाहिली. या दुकानात सात कर्मचारी काम करत होते. जेव्हा गुंजन यांना कळले की त्या छोट्या दुकानाचा मालक आपल्या मुलांना परदेशात शिक्षण देत आहे. तेव्हा त्यांना या असंघटित क्षेत्रातील प्रचंड क्षमतेची जाणीव झाली. त्यांनी २०२३ मध्ये ८ लाख रुपयांच्या भांडवलासह आणि २५० चौरस फुटांच्या दुकानासह आपला स्टार्टअप सुरू केला. हे केवळ लॉन्ड्री आणि ड्राय क्लीनिंगपुरते मर्यादित नाही. ते पडदे, सोफा कव्हर्स, सॉफ्ट टॉईज आणि शूजसाठी सर्वसमावेशक उपाययोजना पुरवते. हा ब्रँड विश्वास, पारदर्शकता आणि तंत्रज्ञान या तीन स्तंभांवर उभारलेला आहे. ग्राहकांच्या सोयीसाठी, मोबाईल ॲप, चॅटबॉट्स आणि १२०-मिनिटांत एक्सप्रेस डिलिव्हरी यांसारख्या सेवा सुरू करण्यात आल्या आहेत. या ब्रँडने कॅफे + लॉन्ड्री नावाची एक अनोखी संकल्पना देखील सादर केली आहे, जिथे ग्राहक त्यांचे कपडे धुतले जाण्याची वाट पाहत असताना काम करू शकतात किंवा गप्पा मारू शकतात.

### ग्राहकांच्या भावनांकडे लक्ष

गुंजन परमार यांचा विश्वास आहे की कपडे म्हणजे केवळ कापड नाही. त्याऐवजी, त्या आठवणी आणि आत्मविश्वास आहेत. एकदा जेव्हा त्यांनी एका ग्राहकाच्या वडिलांच्या जुन्या ब्लेझरवरील शाईचे हट्टी डाग काढले, तेव्हा तो ग्राहक भावूक झाला. हेच या ब्रँडचे खरे यश आहे. याव्यतिरिक्त हा ब्रँड पर्यावरणाचीही विशेष काळजी घेतो. कंपनीची मशिन्स २०% कमी पाणी वापरतात. गुंजन पर्यावरणपूरक रसायने वापरतात. ग्राहकांना लागवड करण्यायोग्य टॅग्ज (बीज टॅग्ज) देणे हा त्यांच्या शाश्वत मॉडेलचा एक महत्त्वाचा भाग आहे.



# टेक ऑफ घेण्यापूर्वीच लागली भयंकर आग; थोडक्यात बचावले २२८ प्रवासी



**नवीदिल्ली(प्रतिनिधी)**–दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर मोठी दुर्घटना होता होता वाचली आहे. विमानाला टेक ऑफ घेण्यासाठी अवघा काही वेळ बाकी असतानाच विमानाला आग लागली. त्यामुळे एकच घबराट पसरली. पण विमानतळ प्रशासनाने वेळीच आग नियंत्रणात आणल्याने मोठी दुर्घटना टळली. जर विमानाने उड्डाण घेतलं असतं आणि ही घटना घडली असती तर भयंकर दुर्घटना घडली असती. विमानात एकूण २२८ प्रवासी प्रवास करत होते. या सर्वांचा जीव धोक्यात आला असता. मात्र, दैवबलवत्तर म्हणून मोठी हानी टळली.

मिळालेल्या माहितीनुसार, स्विस इंटरनॅशनल एअरलाइन्सचे LX147 हे विमान दिल्लीहून झुरिचला रवाना होणार होते. विमान धावपट्टीवर टेकऑफच्या प्रक्रियेत असतानाच एका इंजिनमध्ये बिघाड झाला आणि आग लागली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून वैमानिकाने तात्काळ टेकऑफ रद्द केले आणि तातडीने प्रवाशांना बाहेर काढण्याचे आदेश दिले.

या घटनेत ६ प्रवासी जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आग लागल्याचे कळताच विमानातील सर्व प्रवाशांना तातडीने 'इमर्जन्सी स्लाइड'च्या सहाय्याने सुरक्षित बाहेर काढण्यात आले. एअरलाइनच्या म्हणण्यानुसार, काही प्रवाशांना शिडीच्या सहाय्याने बाहेर काढण्यात आले, कारण ते स्लाइडचा वापर करू शकत नव्हते. या दरम्यान काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते, परंतु क्रू मेंबर्सनी परिस्थिती हाताळली.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, एअरबस ३३० (विमान क्रमांक LX147) ने पहाटे १.०८ वाजता उड्डाण सुरू केले, त्याच वेळी त्याचे एक इंजिन निकामी होऊन त्याला आग लागली. दिलासादायक बाब म्हणजे विमानातील सर्व क्रू मेंबर्स सुरक्षित आहेत. विमानात एकूण २२८ प्रवासी आणि चार लहान मुले होती.

SWISS एअरलाइनने अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, दिल्लीत LX147 या विमाना-बाबत एक घटना घडली. हे irbus 330 विमान होते. विमानात २२८ प्रवासी आणि ४ लहान मुले होती. एअरलाइनने या प्रकरणाच्या चौकशीसाठी एक विशेष टीम तयार केली आहे. निवेदनात पुढे सांगितले की, उड्डाण करण्याच्या काही वेळातच, रात्री १ च्या सुमारास इंजिनमध्ये बिघाड झाला. त्यानंतर वैमानिकाने सुरक्षेचा उपाय म्हणून उड्डाण थांबवले आणि विमान रिकामे करण्याचा निर्णय घेतला.

# आरोग्य उपकेंद्रापासून जिल्हा रुग्णालयापर्यंत सर्व आरोग्य समित्यांचे पुनरुज्जीवन करावे -सार्वजनिक आरोग्य मंत्री



**मुबई(प्रतिनिधी)**–राज्यातील आरोग्य सेवेच्या गुणवत्तेवर देखरेख करण्यासाठी व नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत असलेल्या, रुग्ण कल्याण समिती, जन आरोग्य समिती, महिला आरोग्य समिती, ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समिती या समित्यांची जबाबदारी महत्वाची आहे. सर्वसामान्य नागरिकांना अधिक चांगली व परिणामकारक आरोग्य सेवा देण्यासाठी या सर्व समित्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना विविध योजनांच्या माध्यमातून आरोग्यसेवा दिल्या जातात. या सर्व लोकहिताच्या योजनांची काटेकोर अंमलबजावणी करून नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आरोग्य समित्यांची भूमिका महत्वाची असते.

ग्रामीण भागासाठी 'ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समिती व शहरी भागासाठी महिला आरोग्य समिती कार्यरत आहे. या समित्या स्वच्छता, पोषण, पाणीपुरवठा, तसेच प्राथमिक आरोग्य सेवा देण्यात महत्वाची भूमिका बजावत असतात. त्याचप्रमाणे जन आरोग्य समिती व रुग्ण कल्याण समिती या समित्या आरोग्य संस्थांमध्ये रुग्णकेंद्रित सेवा, सेवेची गुणवत्ता व निधीच्या पारदर्शक वापरासंबंधी लक्ष ठेवण्याची भूमिका बजावतात.

ग्रामीण भागासाठी कार्यरत असलेल्या ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा स्वच्छता समिती मध्ये अशासकीय सदस्य म्हणून ग्रामपंचायत सरपंच, ग्रामपंचायत सदस्य (प्राधान्याने महिला), बचत गट, तरुण मंडळ, वन सुरक्षा समिती, महिला मंडळ, सामाजिक संस्था, गरोदर व स्तनदा माता, तीनवर्षा पर्यंतचे मुल असलेली माता व शासकिय रुग्णालयात आरोग्य सेवा घेणारे किंवा बरे झालेले दिर्घकालीन आजाराचे रुग्ण यांचा सदस्य म्हणून समावेश असणे अपेक्षित आहे.

शहरी भागासाठी कार्यरत असलेल्या महिला आरोग्य समिती (चड)' मध्ये समाजकल्याण, सामाजिक बांधिलकी व नेतृत्व कौशल्य असलेल्या स्थानिक झोपडपट्टी भागातील जास्तीत जास्त वीस महिला सदस्यांचा समावेश अपेक्षित आहे.

ग्रामीण भागातील आरोग्य उपकेंद्रा अंतर्गत जन आरोग्य समिती कार्यरत आहे. या समितीमध्ये ग्राम पंचायतीचे सरपंच, ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा स्वच्छता समिती अध्यक्ष/महिला सदस्य, महिला बचत गट अध्यक्ष, शालेय आरोग्यदूत, युवाकेंद्र युवा प्रतिनिधी, क्षयरोगमुक्त नागरिक, तसेच एक किंवा दोन मुलानंतर नसबंदी केलेला पुरुष यांचा विशेष निमंत्रित म्हणून समावेश अपेक्षित आहे.

# बाबा बुवांनी अधात्म सांगावं, मनाला वाटेल तसा इतिहास सांगू नये; छत्रपती संभाजीराजेंचा धीरेंद्र शास्त्रींना इशारा



**कोल्हापूर(प्रतिनिधी)**–बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदासांसंबंधी केलेल्या वक्तव्यावरुन चांगलाच वाद रंगल्याचं चित्र आहे. माजी खासदार छत्रपती संभाजीराजे यांनी धीरेंद्र शास्त्री यांच्या या वक्तव्याचा समाचार घेतला. बाबा बुवांनी अध्यात्म सांगावं, मनाला वाटेल तसा इतिहास सांगू नये असं संभाजीराजे म्हणाले. तसचे अध्यात्म आणि इतिहास यांची सरमिसळ करून त्याची अहवेलना करू नये असंही ते म्हणाले.

बुवा बाबांनी अध्यात्म सांगावे. मनाला वाटेल तसा इतिहास सांगत बसू नये. हिंदू धर्माच्या अध्यात्माची आणि इतिहासाची उंची अत्युच्च आहे. त्याची वाटेल तशी आणि चुकीच्या पद्धतीची सरमिसळ करून अध्यात्माची आणि इतिहासाची अवहेलना करू नये.

नागपुरात जामठा इथे एका कार्यक्रमात बोलताना बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि रामदास स्वामी यांचे संबंध गुरूशिष्याचा असल्याचा दावा करत त्यांच्या नात्याचा एक किस्सा सांगितला. शिवाजी महाराज युद्ध करून थकले तेव्हा एक दिवस ते समर्थ रामदास स्वामींकडे गेले आणि आपला मुकूट उतरवून रामदास स्वामींना दिला. आता हे राज्य तुम्ही सांभाळा अशी विनंती केली. त्यावर रामदास स्वामींनी हसून मी राज्य चालवतो, तुम्ही अंमलबजावणी करा असं म्हटलं असा दावा धीरेंद्र शास्त्रींनी केला.

तसंच हिंदूंनी चार मुलं जन्माला घालावी आणि एकाला आरएसएसचा स्वयंसेवक करावा असं आवाहनही हिंदू समाजाला केलं. जगातील पहिले भारतदुर्गा मंदिरा भव्य शिलान्यास सोहळा शुक्रवारी पार पडला. या कार्यक्रमात धीरेंद्र शास्त्रींनी हे वक्तव्य केलं.

धीरेंद्र शास्त्रींच्या वक्तव्यानंतर काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेतला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यावर पत्रकार परिषद घेतली. त्यांनी धीरेंद्र शास्त्रींच्या वक्तव्याचा समाचार घेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरही निशाणा साधला. सोबतच मुख्यमंत्री फडणवीस आणि संघाने जाहीर माफी मागावी, अशी मागणीही केली. तर भाजपकडून छत्रपती शिवरायांचा इतिहास बदलण्याचा प्रयत्न होत आहे आणि हा मनुवादी विचारसरणीचा कट असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी केला.

शिवराय थकले आणि राजपाट समर्थांकडं दिला, हे धीरेंद्र शास्त्री यांचं विधान अत्यंत संतापजनक आहे. अशी विधानं करून महाराष्ट्राच्या संत परंपरेला आणि विचारांना गालबोट लावण्याचा प्रयत्न असल्याची टीका आमदार रोहित पवारांनी केली. तर धीरेंद्र शास्त्रींच्या वक्तव्यावरून आमदार अमोल मिटकरींनी हल्लाबोल केला. धीरेंद्र शास्त्रींच्या तोंडून वदवून घेतलेला चुकीचा इतिहास खपवून घेणार नाही असं त्यांनी सुनावलं. धीरेंद्र शास्त्रींना खरात बाबाच्या सोबत ट्रिटमेंटला पाठवायला हवा असं त्यांनी आपल्या एक्स पोस्टमध्ये म्हटलं.

# १ मेपासून 'मराठी अनिवार्य'! परवाने रद्द करण्याच्या निर्णयाविरोधात रिक्षा-टॅक्सी संघटनेचा एल्गार

**मुंबई(प्रतिनिधी)**–'व्यवहारिक मराठी' सर्व व्यावसायिक प्रवासी वाहन चालवणाऱ्या चालकांना अनिवार्य करण्यासंदर्भात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कामगार नेते शशांक राव आणि शिवसेनेचे नेते संजय निरुपम यांच्यासह विविध रिक्षा व टॅक्सी चालक संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक बोलावली होती. या बैठकीत ऑटो-टॅक्सी संघटनेनं राज्य सरकारच्या प्रस्तावित निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला आहे. २ मे २०२६ पासून मराठी लिहिता-वाचता न येणाऱ्या ऑटो-टॅक्सी चालकांचे परवाने रद्द करण्याचा निर्णय अन्यायकारक आणि गैरकायदेशीर असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. या पार्श्वभूमीवर पुढील भूमिका ठरवण्यासाठी ऑटो-टॅक्सी चालकांची महत्त्वाची सभा बोलावण्यात आली आहे. ही सभा सोमवार, २७ एप्रिल २०२६ रोजी गोरेगाव येथील केशव गोरे स्मारक ट्रस्ट हॉलमध्ये होणार असून मोठ्या संख्येने चालक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. संघटनेचे पदाधिकारी शशांक राव यांनी सर्व चालकांना सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. 'व्यवहारिक मराठी' सर्व व्यावसायिक प्रवासी वाहन चालवणाऱ्या चालकांना अनिवार्य करण्यासंदर्भात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कामगार नेते शशांक राव व संजय निरुपम यांच्यासह विविध रिक्षा व टॅक्सी चालक संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक बोलावली आहे.

ही बैठक सोमवार, दिनांक २७ एप्रिल रोजी परिवहन मंत्री यांच्या दालनात (४०१ विस्तारित इमारत, मंत्रालय) दुपारी १२.३० वाजता होणार आहे.


**जाहिर प्रगटन**

माझे पक्षकार बालाजी पिता वैजनाथ इंदुरकर वय ७५ वर्षे धंदा शेती रा.लोहा ता.लोहा जि.नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन जाहिर प्रगटन प्रकाशित करण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे हरसद ता.लोहा येथील शेत गट क्र. १६ मधील कांताबाई निवृत्ती लंगोटे यांच्या नावे असलेली ०.३८ आर व पोट खराब ०.०२ आर अशी एकुण ०.४० आर जमीन फक्त.

ज्याची चतु:सिमा :- पुर्वेस :- चंद्रकांत डिगांबर लंगोटे यांचे शेत, पश्चिमेस :- मुक्ताबाई मारोतराव जाधव यांचे शेत, दक्षिणेस :- अमेल शिवाजी लंगोटे यांचे शेत, उत्तरेस :- बालाजी वैजनाथ इंदुरकर यांचे शेत, स्थित मौजे हरसद ता.लोहा जि.नांदेड ही जमीन माझ्या पक्षकारांनी कायमची खरेदी घेण्याचा करार/सौदाचिठ्ठी दिनांक १५/०४/२०२६ रोजी केली आहे. माझे पक्षकार वरील जमीनीचे खरेदीखत १०/०६/२०२६ पर्यंत करुन घेण्या संबंधीचा करार करुन सौदाचिठ्ठी केली आहे. माझे पक्षकार हे वर नमुद मालमत्तेचे खरेदीखत ठरल्या तारखे पर्यंत करुन घेणार आहेत.

तरी माझ्या पक्षकारांनी वरील जमीनीच्या खरेदीचा व्यवहार केलेला असल्यामुळे सदर जमीनीचे संबंधाने कोणत्याही प्रकारचे हक्क संबंध असल्यास, आपण माझ्या पक्षकाराकडे जाहिर प्रगटन प्रकाशित झाल्या पासुन सात दिवसाच्या आत लेखी स्वरुपात आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणाचाही आक्षेप आला नाही तर माझे पक्षकार हे करारा प्रमाणे खरेदीखत करुन घेतील. त्यानंतर कोणाचाही, कसल्याही प्रकारचा आक्षेप विचारात घेतल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी. तसेच माझे पक्षकार हे मुद्दती प्रमाणे खरेदीखत करुन घेतील.

माहितीस्तव सादर.

तर्फे :-
अॅड.बि.आर.गायकवाड
कोर्ट लोहा
मो.नं.७३५०२९१०१०

जाहिर प्रगटन देणार
बालाजी पिता वैजनाथ इंदुरकर
रा.लोहा ता.लोहा जि.नांदेड


# कीर्तनासाठी आलेल्या १५ वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू

**धाराशिव (प्रतिनिधी)**–धाराशिव जिल्ह्यातील मलकापूरमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. मलकापूरच्या दत्त देवस्थान इथं दुर्दैवी घटना घडली आहे. एकनाथ लोमटे महाराज यांच्या संस्थेत किर्तनासाठी आलेल्या १५ वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू झाला आहे. पाण्यात पोहण्यासाठी गेलेल्या रुद्र धुमाळ या वारकरी मुलाचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लोमटे महाराजाच्या मलकापूर येथील मठात सप्तहाचे आयोजन केले होते. सप्तहास तेर येथील वारकरी शिक्षण संस्थेतील मुलं कीर्तन कार्यक्रमासाठी आली होती. ५ मुले बाजूच्या मठा शेजारील तळ्यात पोहण्यासाठी गेली होती. त्यातील एका मुलाचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. रेस्क्यू टीमने बुडालेल्या मुलाचा मृतदेह बाहेर काढला आहे. एवढी मुले जर मलकापूर मठात आली होती तर त्यांची काळजी या मठातील सदस्यांनी का घेतली नाही असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मलकापूर येथील स्वयंघोषित राष्ट्रसंत म्हणून लोमटे महाराज कायम वादात राहिले आहेत. भक्तांची फसवणूक बलात्कार व जमीन हडपने यासारखे अनेक गुन्हे यापूर्वी महाराजावर दाखल झाले होते.

नाशिक येथे कामासाठी असलेल्या ३७ वर्षीय शिवाजी बबन कांबळे यांचा परभणीत साडूच्या घरी जात असताना उष्माघाताने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. दिवसभर उन्हात फिरून चक्कर आल्याने उष्माघात होवून त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती त्यांच्या भावाने पोलीस स्टेशनला दिली. या प्रकरणी पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# शासन व युनिसेफमार्फत खेळ आणि संवादाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना लिंग समभावाचे धडे

**मुंबई(प्रतिनिधी)**–लिंग भेद दूर करण्याबाबत राज्य शासनाच्या सहाय्याने अंगाई आणि युनिसेफतर्फे लिंग समभाव या विषयावर विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना प्रबोधनपर प्रशिक्षण दिले जात आहे. युनिसेफ आणि अंगाई (णछत्रऋख) यांच्या सहकार्याने देशात पहिल्यांदा धाराशीव जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आलेल्या लिंग समभाव शिक्षण उपक्रमामुळे ग्रामीण मुलींच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून येत आहे. खेळाधारित शिक्षण, संवाद आणि सहभागात्मक उपक्रमांच्या माध्यमातून किशोरवयीन मुला-मुलींमध्ये समानतेची जाणीव निर्माण होत आहे.

हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या शिक्षण आणि प्रशिक्षणाची जिल्हा संस्था डाएटच्या (डीआयईटी) सहकार्याने राबवण्यात आला. संपूर्ण भारतामध्ये केवळ धाराशिव जिल्ह्यात हा प्रकल्प राबवला असून त्यामध्ये १२० शाळा, ८००हून अधिक शिक्षक आणि १८,००० हून अधिक मुलांचा सहभाग होता. धाराशिवमध्ये प्रायोगिकतत्वावर सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील धाराशिवमध्ये, अंगाई-युनिसेफतर्फेलिंग समभाव हा विषयखेळाधारित शिक्षणाद्वारे किशोरवयीन मुले-मुली, शिक्षक आणि गावातील समुदायांना शिकवण्यात आला. मीना राजू मंच हा इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात आला असून लिंग समभावाशी संबंधित विविध पैलूंची माहिती त्यांना करून देण्यात आली. त्यामध्ये संवाद, खेळ, चर्चा अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. या कार्यक्रमाला स्थानिक संस्था स्वयं शिक्षण प्रयोग (एसएसपी), कोरो आणि मावा या स्वयंसेवी संस्थांचा सहभाग होता.

मी माझ्या आईशी आणि काकूशी याबद्दल बोलले. त्यांनाही हा भेदभाव जाणवला नव्हता. त्या जुन्या परंपरेनुसार मुलींना कमी अन्नाची गरज असते, असंच मानून चालल्या होत्या. पण मी त्यांना समजावून सांगितले की आम्हा दोघांनाही समान अन्नाची गरज आहे, कारण आम्ही दोघेही समान कामं करतो, आर्णी गावातील इयत्ता आठवीत शिकणाऱ्या प्रज्ञा पाटोळे हिने स्वअनुभव कथन केले. शासन आणि युनिसेफ, अंगाई यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या उपक्रमा-मुळे मुलींना लिंग समभावाचे शिक्षण मिळाले. यामुळे विद्यार्थ्यांच्या आणि त्यांच्या सहायाने कुटुंबीयांच्या विचारसरणीत सकारात्मक फरक पडत आहे.


**टी. सी. हरवली**

माझी रेवता सुरेश उटकर या नावाची इयत्ता दहावी पास टी. सी. बोधडी ते किनवट दरम्यान बस प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा. संपर्क पत्ता-रेवता सुरेश उटकर मु. पो. लिंबगाव ता. जि. नांदेड मो. नं.८४८४००४८८३

**Change In Name**

My old name is **KHATIJA BEGUM**, Which now I am changing as [ New name] **KHADIJA NAHID RAUF AHMED QURESHI**, Hence, forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Sign by-KHADIJA NAHID RAUF AHMED QURESHI . ADDRESS: Karegaon road,yousuf colony, parbhani.Maharashtra.

Mobile no : 8999211589

पंजीयन.क्र.एन.एन.डी/बी. एन. के./११५-७४../दिनांक १०.०६.१९७४

**वीज कामगार को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. नांदेड**

Email ID: socetyveejkamgaryahoo.in मो. न. (७८७५९६४२२२)

**व्ही.आय.पी. रोड महादेव दालमील च्या बाजूला नवीन मोंढा नांदेड**

| | | |
|---|---|---|
| **सतिश आनंदराव वाघमारे (मानदसचिव)** | **कैलास नरहरी राऊत (उपाध्यक्ष)** | **रमेश गोविंदराव वडगावे (अध्यक्ष)** |

जा.क्र./ वीकासो /२०२६-२७/ १५०    दिनांक :- २५/०४/२०२६

**जाहीर प्रगटन**
**(सभासदा करीता फक्त)**

या जहीर (प्रगटन) नोटीस द्वारे सुचित करण्यात येते की, वीज कामगार को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. नांदेड. च्या सर्व सभासदांना विनंती कि, संस्थेने सन २००४-२००५ व सन २००५- २००६ या वर्षाचे लाभांश / सभासद ठेव व्याज सभासदांना वाटप करणे साठी संस्थेचे कर्मचारी / पदाधिकारी / सभासद यांना अनामत उचल रक्कम दिली होती. परंतु संस्थेच्या काही कर्मचारी / पदाधिकारी सभासद यांनी सदरील लाभांश व सभासद ठेव व्याज वाटप अनामत उचल रक्कमे प्रमाणे संस्थेच्या सभासद यांना वाटप केलेल्या रक्कमेचा हिशोब / जमा खर्च किंवा पोचपावती यादी संस्थेत सादर केलेली नाही. त्यामुळे संस्थेने संबंधित कर्मचारी/ पदाधिकारी सभासद यांच्या विरुध्द सदरील अनामत रक्कमे बाबत रक्कम वसूलीचा दावा सहकार न्यायालय नांदेड व दावा निकालाची अमल बजावणी करिता दिवाणी न्यायालय कनिष्ट व वरिष्ठ स्तर नांदेड येथे दाखल केलेले असून ते प्रलंबित आहेत. अशा परिस्थितित वरील सर्व बाबींचे अवलोकन करुन संस्थेच्या सर्व सभासद यांना कळविण्यात येते कि, संस्थेच्या सन २००४-२००५ व सन २००५-२००६ या वर्षाचे लाभांश व सभासद ठेव व्याज रक्कमे (जमा खर्चा) बाबत काही तक्रार असल्यास संस्थेच्या कार्यालय व्ही आय पी रोड महादेव दालमिल जवळ नांदेड येथे दिनांक ९-५-२०२६ पर्यंत आपला लेखी आक्षेप / तक्रार व सोबत पासबूक सादर करावेत. अन्यथा दिनांक ९-५-२०२६ रोजी नंतर आलेल्या लेखी आक्षेप / तक्रार अर्जाची दखल / विचारात घेतली जाणार नाही व मा. न्यायालयीन प्रक्रियेस अधीन राहून सन २००४-२००५ व सन २००५-२००६ या वर्षाचे लाभांश व सभासद ठेव व्याज रक्कमेच्या संस्था स्तरावर जमा खर्चा बाबत संस्थेच्या पोटनियमाप्रमाणे व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ प्रमाणे जमा खर्चा करिता संस्था स्तरावर निर्णय घेण्यात येईल यांची सर्व संस्थेच्या सभासदानी नोंद घेण्यात यावी.

**अध्यक्ष / मानद सचिव**
**वीज कामगार को - ऑप क्रेडीट सोसायटी लि. नांदेड .**

**ऑफिसची जागा त्वरीत विकणे आहे.**

नांदेड शहरातील मनपा अंतर्गत आनंदनगर येथील राज मॉल मधील ऑफिसची जागा क्र. २१० ज्याचे एकूण क्षेत्रफळ ७७२ चौ.फुट आहे. त्यामध्ये बाथरूमचा समावेश असून ही ऑफिसची जागा त्वरीत विक्री करणे आहे.इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

**संपर्क नंबर**

| | |
|---|---|
| **दिनेश कुलकर्णी** | **तानाजी घोगरे** |
| **९७६४१२३५९३** | **७८४१८६५२८७** |

**जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, आरोग्य विभाग जिल्हा परिषद, नांदेड**

| Ph. No. 02462-240125 | Email ID- dhostorennd2@gmail.com |
|---|---|
| **आरोग्य सेवा** | जा.क्र. जिपनां/आरोग्य/औषधीभांडुर /जाहिरात/२०२६<br>कार्यालय आरोग्य विभाग,<br>जिल्हा परिषद, नांदेड २४/०४/२६ |

Health Department, Zilla Parishad Nanded Government of Maharashtra

**Notice For Tender**

आदिवासी उपाय योजना सन २५-२६ अंतर्गत प्रा. उप आरोग्य केंद्राच्या औषधी अनुदानात वाढ करणे (TSP) लेखाशीर्ष २२२५E२४९ TR२२०००१-३१ औषधी खरेदी करणे

Health Department,Zilla Prashad Nadned Government of Mahrashtra invites Proposal from reputed and experienced companies to participate in the competitive bidding जि. प. नांदेड आदिवासी उपाय योजना सन २५-२६ अंतर्गत प्रा. उप आरोग्य केंद्राच्या औषधी अनुदानात वाढ करणे (TSP) लेखाशीर्ष २२२५E२४९ TR२२०००१-३१ औषधी खरेदी करणे

For details Tender documents interested bidders should vist http:/ GEM² PORTL

Tender submission would be online and the dedline to shubmit the proposals in ११ मे २०२६ 5 PM

DISTRICT HEALTH OFFICER
ZILLA PARISHAD, NANDED

**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## नांदेड तालुका महसूल प्रशासनाचा 'शोध वंचित'चा विशेष उपक्रम, राज्यासाठी पथदर्शी ठरणार

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)**– तालुक्यात महसूल विभागाने महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून शोध वंचित लाभार्थ्यांचा या नावीन्यपूर्ण विशेष उपक्रमांतर्गत शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असूनही वंचित असणाऱ्या लाभार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना लाभ देण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. यामुळे शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थी संख्येत वाढ होणार आहे. नांदेड तालुक्यातील हा नावीन्यपूर्ण उपक्रम राज्यात लक्षवेधी ठरू शकतो हे विशेष.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली व उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड यांच्या सूक्ष्म नियोजनात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर नांदेड तालुक्यातील वाजेगाव महसूल मंडळातील वाजेगाव येथे राष्ट्रमाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात येत्या ३० एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता घेण्यात येणार आहे. सदर शिबिराचे उद्घाटन नांदेड दक्षिण विधानसभेचे आमदार आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांच्या हस्ते होणार आहे. या शिबिरात महसूल विभागाबरोबरच शासनाच्या विविध विभागाकडून लाभार्थ्यांना लाभ दिला जाणार आहे.

या शिबिराच्या माध्यमातून शोध वंचित लाभार्थ्यांचा हा नावीन्यपूर्ण विशेष उपक्रम राबविला जात आहे. शासनाच्या विविध योजनेची माहिती गाव पातळीवर देऊन विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असूनही वंचित असणाऱ्या विशेष सहाय्य योजनेअंतर्गत निराधार विधवा, दिव्यांग, वयोवृद्ध, दुर्धर आजारग्रस्त, अत्याचारित महिला, परितक्त्या, अनाथ मुले, एकल महिला, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंब, घटस्फोटीत महिला आदी लाभार्थ्यांचा शोध घेऊन त्यांचे अर्ज भरून घेऊन लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. या उपक्रमात नायब तहसीलदार (महसूल) सुनील माचेवाड, स्वप्नील दिग्गलवार तसेच महसूल विभागाचे क्षेत्रीय कर्मचारी, एकात्मिक बाल विकास प्रकल्प विभागाचे अधिकारी, अंगणवाडी कर्मचारी तसेच अनुलोम, विहान या सामाजिक संस्था प्रयत्नशील असून विशेष कॅम्प आयोजित करून योजनेसाठी आवश्यक कागदपत्रासह अर्ज भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. राज्यात महाराजस्व समाधान शिबीर सध्या चालू असून, नांदेडमधील या उपक्रमामुळे शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थी संख्येत लक्षणीय वाढ होणार असल्याने सदर उपक्रम लक्षवेधी ठरणार आहे.

## गोदावरी नदी प्रदूषणमुक्त प्रकल्पाची महापालिका आयुक्त डॉ. डोईफोडे यांनी केली पाहणी

**नांदेड (प्रतिनिधी)** –केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत प्रगतिपथावर असलेल्या गोदावरी नदी प्रदूषणमुक्त प्रकल्पाची पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोइफोडे यांनी रविवार, दि. २६ एप्रिल रोजी पाहणी केली आहे. शहरातील नदीत मिसळणारे सांडपाणी रोखण्यासाठी तातडीने काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. यावेळी अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, शहर अभियंता सुमंत पाटील, कनिष्ठ अभियंता रविंद्र सरपाते, प्रकल्प सल्लागार सुखदेव तुवर, शारदा कंस्ट्रक्शनचे सुनिल कोरके, सूर्यकांत लोखंडे आदी उपस्थित होते.

नांदेड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि विशेषतः गोदावरी नदी प्रदूषण मुक्त करण्यासाठी '१०० दिवसांचा कृती आराखडा' तयार करण्यात आला असून या आराखड्यात नदी प्रदूषणमुक्त कामाचा समावेश आहे. नांदेड शहरातून वाहणाऱ्या गोदावरी नदीमध्ये नैसर्गिक नाले वाहुन येतात. सदर वाहुन येणाऱ्या नाल्यांपैकी बिलालनगर नाला, सिध्दार्थ नगर नाला, नावघाट नाला, कालापूल नाला, गाडीपुरा नाला, शनिमंदिर नाला, बंदाघाट नाला हे प्रमुख नाले आहेत. गोवर्धनघाट ते NRP मलउपसा केंद्रापर्यंत गोदावरी नदीच्या समांतर मलनिःस्सारण वाहिण्यांचे पाणी घेऊन जाण्यासाठी मलनिःस्सारण वाहिणी कार्यान्वित होती. परंतु कालांतराने



नदीमध्ये गाळ प्रवाहित होवुन सदर मलनिस्सारण वाहिणी क्षतिग्रस्त झाली आहे.

पालिका हद्दीमध्ये गोदावरी काठाची लांबी एकूण ४.१ कि.मी. असून, शहरातून प्रवाहित नदीमध्ये नाल्यांचे पाणी जाऊन जलप्रदूषण रोखण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत गोदावरी नदीच्या समांतर बाजूस ३.३ कि.मी. लांबीची १२०० मी. मी. व्यासाची आरसीसी पाईपलाईन मलवाहिणीचे काम महापालिकेने पूर्ण केले आहे. उर्वरित नगिनाघाट ते बंदाघाट या भागात सुशोभिकरणाचे काम पूर्ण झाले असल्यामुळे त्या भागात मलवाहिणी टाकणे शक्य नाही व तसेच या भागामध्ये

> नागरिकांना दर्जेदार सेवा आणि स्वच्छ गोदावरी उपलब्ध करून देणे हे महापालिकेचे प्राथमिक उद्दिष्ट असल्याचे नमुद करून अमृत २.० मलनिसारण योजनेची कामे माहे मे २०२६ अखेरपर्यंत पूर्ण झाल्यानंतर गोदावरी नदीमध्ये नाल्यांचे पाणी जाणे पुर्णतः बंद होणार असल्याचे यावेळी पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोइफोडे यांनी सांगितले आहे.

कोणताही नाला प्रवाहित होत नसल्याने बंदाघाट ते गोवर्धनघाट या उर्वरित भागात २ नाले प्रवाहित होत असल्याने ६०० मी. मी. व्यासाची मलनिःस्सारण वाहिणी घाटाच्या कच्च्या भागात अंथरुन बंदाघाटच्या वरच्या बाजूस २.५ द.ल.ली. प्रतिदिन क्षमतेचे पॉकेट मलशुध्दीकरण केंद्राचे बांधकाम करण्यात येणार आहे. सदर पॉकेट मलशुध्दीकरण केंद्राचे बांधकाम करणेसाठी २ कोटी खर्च होणार आहेत. तसेच NRP पाईपलाईन टाकण्यासाठी २२ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

या टाकण्यात आलेल्या पाईपलाईनवर गोदावरी नदीस येऊन मिळणाऱ्या नाल्यांच्या ठिकाणी पाईपलाईन चोकअप होऊ नये म्हणून कचरा काढण्यासाठी एकूण १७ इंटरसेप्ट स्ट्रक्चरचे बांधकाम करण्यात आलेले आहे.

## नांदेड विभागात विशेष तिकीट तपासणी मोहीम; ४.६५ लाखांचा महसूल वसूल

**नांदेड (प्रतिनिधी)** –दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात २३ एप्रिल रोजी सकाळी पाच ते रात्री आठ वाजेपर्यंत रेल्वे प्रवास नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी तसेच विनातिकीट व अनियमित प्रवासाला आळा घालण्यासाठी विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली.

ही मोहीम बी. रितेश, विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तिकीट तपासणी पथकांच्या सहभागाने पार पडली. या मोहिमेत २९ तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला असून ३१ गाड्यांची तपासणी करण्यात आली. सखोल



तपासणीदरम्यान विनातिकीट प्रवास, अनियमित प्रवास आणि बुक न केलेल्या सामानाच्या एकूण ७४६ प्रकरणांचा शोध लागला. या मोहिमेद्वारे रेल्वेला ४ लाख ६५ हजार ६९५ रुपये इतका महसूल प्राप्त झाला. विनातिकीट प्रवास ६१६ प्रकरणे भाडे २,६२,६६५ व दंड १,५६,३५०, अनियमित प्रवास ५६ प्रकरणे भाडे २०,६३० व दंड १५,०००, बुक न केलेले सामान ७४ प्रकरणे रक्कम ११,०५०.

नांदेड विभागाने प्रवाशांना योग्य तिकीट घेऊन प्रवास करण्याचे व रेल्वे नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे, ज्यामुळे सर्वांसाठी सुरक्षित व सुलभ प्रवास सुनिश्चित होईल. विनातिकीट प्रवासाला आळा घालण्यासाठी व रेल्वे महसुलाचे संरक्षण करण्यासाठी अशा तपासणी मोहिमा पुढेही सातत्याने राबविण्यात येणार आहेत.

### प्रेताची ओळख पटविण्यासाठी सहकार्य करा- रेल्वे पोलीस

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील रेल्वे स्टेशनवर नांदेड-पूर्णा या रेल्वे मार्गावरील प्लॅटफॉर्म क्र. ४ जवळ एका अनोळखी पुरुषाचे प्रेत रेल्वे पोलीसचे हवालदार पंकज पुरी यांना आढळून आले आहे. प्रथमदर्शनी सदरील इसम नैसर्गिकरित्या मरण पावल्याचे रेल्वे पोलिसांनी अहवालात नमूद केले आहे.

मयत इसमाचे अंदाजे वय ६० वर्षे असून, बांधा सडपातळ आहे. सदरील लांबट चेहऱ्याच्या प्रेताचा रंग काळा असून, पांढऱ्या रंगाचा बनियान व निळ्या रंगाची चेक्सची लुंगी परिधान केली आहे. सदरील प्रेताची ओळख अद्यापपर्यंत पटली नसून वरील वर्णनाच्या व्यक्तीस कुणी ओळखत असल्यास रेल्वे पोलिसांशी ९५११८०२८५६ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन रेल्वे पोलीस प्रशासनाने केले आहे.

## अल्पवयीन मुलीचा बालविवाह रोखण्यात पोलिसांना यश

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्हा पोलीस दलाच्या तत्परतेमुळे एका अल्पवयीन मुलीचा विवाह रोखण्यात पोलिसांना यश आले. सोमेश कॉलनी भागातील कला मंदिराच्या पाठीमागे हा विवाह सोहळा पार पडणार होता, मात्र वेळेत मिळालेल्या माहितीमुळे मोठा अनर्थ टळला आहे.

सोमेश कॉलनी परिसरात २५ एप्रिल रोजी एका अल्पवयीन मुलीचे लग्न लावून दिले जात होते. ही माहिती मिळताच पोलीस अधीक्षक कार्यालयाने तातडीने सूत्रे हलवली. पोउपनि बुलंगे आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलीस पोहोचले तेंव्हा त्या ठिकाणी हळदीचा कार्यक्रम सुरू होता तर दुसऱ्या दिवशी म्हणजे २६ एप्रिल रोजी प्रत्यक्ष विवाह होणार होता. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच मुलगा, मुलगी आणि त्यांचे नातेवाईक घटनास्थळावरून निघून गेले.

या प्रकरणी पोलिसांनी मुलीच्या वडिलांना ताब्यात घेतले असून त्यांची पोलीस ठाण्यात चौकशी सुरू आहे. प्राथमिक तपासात ही मुलगी अल्पवयीन असल्याचे निष्पन्न झाले आहे. हा विवाह लिंबगाव येथील गोपालचावडी, कृष्ण मंदिर येथे २६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता होणार होता. पोलिसांनी मंदिरातील पुजाऱ्यांशी संपर्क साधून या लग्नाबाबत खात्री केली आणि हा बालविवाह रोखला. या प्रकरणाची पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी तत्काळ दखल घेताच त्यांनी लिंबगाव ठाण्याचे सपोनि पंढरीनाथ बोधनकर यांना दिल्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सुनील बुलंगे, पोलीस कर्मचारी नागरगोजे, मडिकुंवार, बनसोडे आणि इतर कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली.

### मंदाबाई मोहनपूरकर यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरातील पूर्णा रोडवरील सिध्दीविनायक अपार्टमेंटमधील रहिवासी तथा ज्येष्ठ महिला श्रीमती मंदाबाई उर्फ कालिंदी मोरेश्वरराव मोहनपूरकर यांचे शनिवार, दि. २५ एप्रिल रोजी रात्री साडेअकरा वाजता निधन झाले. त्या ८३ वर्षांच्या होत्या.



त्यांच्या पश्चात मुले संजय, विजय, नाथा, सुना, नातू, पणतू असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा रविवार, दि. २६ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता राहत्या घरुन निघाली आणि दीड वाजता शांती धाम स्मशानभूमी गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### हरणाबाई नरवाडे यांचे निधन



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** –पाटबंधारे नगर नांदेड येथील ज्येष्ठ महिला हरणाबाई सीताराम नरवाडे (९०) यांचे दि. २५ एप्रिल रोजी रात्री ९:३० वा. निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार असून, त्या मनपाचे सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक यशवंत नरवाडे व कांतराव नरवाडे यांच्या आई होत. हरणाबाई नरवाडे यांच्या पार्थिवावर दि. २६ एप्रिल रोजी दुपारी १२:३० वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, मित्रपरिवार, स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कुसुम देवीदासराव नांदेडकर यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** –पुंडलिकवाडी येथील ज्येष्ठ नागरिक श्रीमती कुसुम देवीदासराव नांदेडकर यांचे दि २५ एप्रिल २०२६ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८३ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर रविवार दि.२६ एप्रिल रोजी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

## प्रताप गायकवाडच्या मारेकऱ्यांना पोलीस कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील नवी वाडी भागात रविवारी रात्री झालेल्या युवकाच्या खूनप्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करीत तिन्ही आरोपींना अटक केली. भाग्यनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तिन्ही मारेकऱ्यांना रविवार, दि. २६ एप्रिल रोजी न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडीत पाठवले आहे.

शहराला लागून असलेल्या नवी वाडी परिसरात रविवारी रात्री जुन्या वादातून प्रताप दत्तात्रय गायकवाड (वय २६) या युवकाची निर्घृण हत्या करण्यात आली. आरोपींनी धारदार शस्त्राने शरीराच्या विविध भागांवर वार केल्याने गायकवाड याचा जागीच मृत्यू झाला.

या प्रकरणी पोलिसांनी विजय रुक्मण वायवळ, सुरज सदाशिव बुक्तरे आणि अनिकेत उर्फ सोनू सदाशिव बुक्तरे या तिघांना अटक केली होती. जुने भांडण आणि वैयक्तिक वादातून हा हल्ला झाल्याची प्राथमिक माहिती पोलीस तपासात समोर आली होती. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनाखाली भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे व त्यांचे सहकारी पोलिसांनी तत्काळ तपास सुरू करून आरोपींना अल्पावधीतच जेरबंद केले.



**नांदेड** –आर्य वैश्य कुलस्वामिनी माता वासवी कन्यका परमेश्वरी जन्मोत्सवानिमित्त कौठा, बालाजी मंदिर विकास नगर ते लातूर फाटा वासवी माता मंदिरापर्यंत शोभायात्रा काढून समारोप करण्यात आला. या प्रसंगी दिलीप कंदकुर्ते, एकनाथ मामडे, नगरसेवक प्रतिनिधी गंगाधर काकडे, गोविंद बिडवई, संदीप गोरे, गंगाप्रसाद कांकर, उत्तमराव वरपडे, आर्य वैश्य परिवार मंडळ अध्यक्ष लक्ष्मीकांत मुक्कावार, सचिन रितेश अमिलकंठवार, सचिन काशेटवार, श्याम पेन्सलवार, बालाजी येरावार, दत्ता धुमशेटवार, राम यरमवार, संतोष पांपटवार आदी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

## माता वासवी जन्मोत्सव रॅलीचे ठिकठिकाणी स्वागत

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – आर्य वैश्य परिवार मंडळ कौठा तथा माता वासवी कन्यका परमेश्वरी जन्मोत्सव समितीच्या वतीने काढण्यात आलेल्या शोभायात्रेचे कौठा नगरीत नगरसेविका सुलोचना धोंडिबाराव काकडे व माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद धोंडीबाराव काकडे यांच्या वतीने फटाक्यांच्या आतीषबाजीमध्ये स्वागत करून पदाधिकारी यांचा सत्कार व समाजबांधवांना थंड रसना बॉटलचे वाटप करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दि. २६ एप्रिल रोजी आयोजक नगरसेविका श्रीमती सुलोचना धोंडिबा काकडे व गंगाप्रसाद काकडे, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश काकडे यांच्या वतीने कौठा येथील निवासस्थानी मिरवणुकीतील सहभागी समाज



बांधव यांच्यासाठी थंड रसना बॉटलचे वाटप करण्यात आले. यावेळी आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत मुक्कावार, सचिव रितेश अंमीलकंठवार, कोषाध्यक्ष सचिन काशेटवार, शाम पेन्सलवार, बालाजी येरावार, गजानन चिद्रावार यांचे स्वागत करून शोभायात्रेतील माता वासवी यांचे विधीवत पूजन केले.

यावेळी फटाक्यांची आतीषबाजीत यात्रेचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी माजी सरपंच पंचफुलाबाई काकडे, संजीवनी काकडे, कांताबाई काकडे, वैशालीताई काकडे, सुरेखाताई काकडे, देवराव काकडे, अंबिकाताई काकडे, नगरसेविका प्रतिनिधी संतोष मोरे, महेंद्र काळे, भारत काकडे, दता काकडे, भागवत बारसे, अशोक दिलेराव, सेवानिवृत्त मुख्याध्यापक संजय पांडे, उत्तम वरपडे, प्रशांत धमलवार, नरेश लालवाणी, रामप्रसाद शर्मा, दर्शन काकडे, प्राचार्य दीपक बच्चेवार, शिवम देवणे, पवन सोनटक्के, चंद्रकांत डहाळे व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विविध मागण्यांसाठी जिल्ह्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा आजपासून बेमुदत बंद -विपीन कासलीवाल

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र फर्टीलायझर्स पेस्टीसाईड्स सीड्स डिलर्स असोसिएशन, पुणे यांच्याकडून राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत सोमवार, दि. २७ एप्रिलपासून बेमुदत बंद आंदोलनाची भूमिका मांडली आहे.

या भूमिकेला नांदेड जिल्ह्यातून जाहीर पाठिंबा दिला असून जिल्ह्यातील सर्व कृषी निविष्ठाची दुकाने बेमुदत बंद ठेवण्यात येतील, असे संघटनेचे प्रमुख विपीन कासलीवाल यांनी सांगितले.

गेली ४-५ वर्षे विक्रेत्यांच्या अडचणींबाबत कृषी विभागाकडे पाठपुरावा करूनही ठोस कार्यवाही न झाल्याने दि. २७ एप्रिल २०२६ पासून राज्यातील सर्व कृषी सेवा केंद्रे बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे.

कंपन्यांकडून रासायनिक खतांचा पुरवठा होताना होणारे लिंकिंग बंद करावे. शेजारील राज्यातून येणारे अप्रमाणित एचटीबीटी कापूस बियाणे शेतकरी हितार्थ प्रतिबंधित करावे. सीलबंद पॅकिंगमध्ये विक्री केल्याने, तपासणीत बियाणे/खत नापास झाल्यास विक्रेत्यास आरोपी न करता साक्षीदार मानावे. तपासणी अधिकारी संख्या, तपासणी अधिकाऱ्यांची संख्या वाढवणारी अधिसूचना रद्द करावी. २० जून २०२५ ची मूळ अधिसूचना कायम ठेवावी. प्रमाणित बियाण्यांसाठी साथी पोर्टलचा वापर विक्रेत्यांवर सक्तीचा न करता कंपनी स्तरापर्यंतच मर्यादित ठेवावा. रासायनिक खतांचा पुरवठा FOR पद्धतीने व्हावा व विक्री मार्जिन वाढवावे. गुणवत्ता तपासणीसाठी घेतलेल्या सॅम्पलची रक्कम शासनाने विक्रेत्यास द्यावी. रक्कम मिळेपर्यंत सॅम्पल घेताना त्याची किंमत रोखीने द्यावी. खरीप हंगाम २०२६ मधील युरिया व डीएपी वितरणाबाबतच्या सूचनांचा फेरविचार व्हावा. कंपन्यांनी विक्रेत्यांकडून मुदतबाह्य किटकनाशके परत घ्यावीत. दुय्यम दर्जाची अवैध किटकनाशके, तणनाशके व बायो पेस्टीसाईडस् विक्रीस प्रतिबंध करावा. बियाणे कायदा २०२५ व किटकनाशक कायदा २०२५ मधील विक्रेत्यांसाठीचे जाचक नियम शिथिल करावेत. कोकण विभागातील आंबा-काजू पिकाच्या नुकसानीसाठी विक्रेत्यांना जबाबदार धरू नये. शेतकऱ्यांना लिंकिंगमुळे होणारा त्रास व अप्रमाणित बियाण्यांमुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी हा बंद पुकारला आहे. खरिप २०२६ शेतकऱ्यांसाठी यशस्वी करण्यासाठी सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे. निवेदनावर संघटनेचे महासचिव विपीन कासलीवाल, विनोद रामदास तराळ पाटील अध्यक्ष. महाराष्ट्र फर्टीलायझर पेस्टिसाइड सीड्स डीलर्स असोसिएशन (माफदा) पुणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com